


# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526



https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026


❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२०७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि.१३ सप्टेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अजितदादांचे २५ शिलेदार ठरले? कुणाचं तिकीटं झालं कन्फर्म

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३मुंबई**

शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन पक्षांत फूट पडल्यानंतर पहिलीच विधानसभा निवडणूक होत आहे. अजित पवारांचा पक्ष महायुतीत आहे. विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटपाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. जागावाटपातच राजकीय पक्षांची खरी अग्निपरीक्षा होत असेत. यातच पक्ष नेतृत्वाचाही कस लागतो. या गोष्टींची जाणीव नेतेमंडळींनाही आहे. त्यामुळे जागावाटपाचा फायनल निर्णय येण्याआधीच महायुतीत दबावाचं राजकारण सुरू झालं आहे. आता सूत्रांकडून जी माहिती मिळाली आहे त्यातून महायुतीतील शिंदे गट आणि भाजपाचं टेन्शन नक्कीच वाढणार आहे.

सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अंतर्गत बैठकीत २५ उमेदवारांची नावं जवळपास फायनल करण्यात आली आहेत. जागावाटपही लवकरच पूर्ण होणार आहे. यावर चर्चा सुरू आहे मात्र तयारी असावी यादृष्टीने आतापासून कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत. या उमेदवारांनाच तिकीट दिलं जाईल असे सांगितले जात आहे. यादी अजून बाहेर आलेली नाही. या यादीत २५ मतदारसंघात कुणाला उमेदवारी द्यायची याची नावं आहेत. बारामती मतदारसंघातून कोण निवडणूक लढणार असा प्रश्न यंदा निर्माण झाला आहे. हा प्रश्न कदाचित निर्माणही झाला नसता. मात्र अजित पवार यांनी केलेल्या काही वक्तव्यांमुळे संभ्रम निर्माण झाला होता. अजित पवारांऐवजी दुसऱ्या कुणाला संधी मिळणार का असा प्रश्न लोकांच्या मनात येत होता.



परंतु, अंतर्गत सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार बारामती मतदारसंघातून पुन्हा अजितदादांचंच नाव निश्चित झालं आहे. त्यामुळे बारामतीतून दुसऱ्या कुणाला तिकीट मिळणार का? हा प्रश्न आता मिटला आहे असे म्हणण्यास हरकत नाही. या यादीत राज्यातील आणखीही काही मतदारसंघ आहेत. ज्याठिकाणी अजित पवारांनी आपल्या शिलेदारांची नाव निश्चित केल्याचे समजते.

### कोण असतील राष्ट्रवादीचे संभाव्य २५ उमेदवार?


या यादीवर नजर टाकल्यास लक्षात येते की अजित पवार गटाने जुन्या अन् विश्वासू शिलेदारांनाच संधी दिली आहे. आंबेगाव मतदारसंघातून विद्यमान सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं आहे. तसेच येवला मतदारसंघातून छगन भुजबळ, वाईमधून मकरंद आबा पाटील, परळीतून धनंजय मुंडे, रायगडमधून आदिती तटकरे, मावळमधून सुनील शेळके, अहेरीतून धर्मराव बाबा आत्राम, खेडमधून दिलीप मोहिते पाटील, जुन्नरमधून अतुल बेनके .यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे.

उदगीरमधून संजय बनसोड, दिंडोरीमधून नरहरी झिरवळ, पुसदमधून इंद्रनील नाईक, पिंपरीतून अण्णा बनसोडे, इंदापूरमधून दत्ता भरणे, कळवण मतदारसंघातून नितीन पवार, जळगाव जिल्ह्यातील अमळनेर मतदारसंघातून अनिल पाटील, कागलमधून मंत्री हसन मुश्रीफ, नगर जिल्ह्यातून आमदार संग्राम जगताप आणि वडगाव शेरी मतदारसंघातून आमदार सुनील टिंगरे यांना उमेदवारी मिळणार असल्याचे सांगितले जात आहे.

## विधानसभेसाठी काँग्रेसकडून स्टार प्रचारकांची यादी जाहीर, राहुल गांधींसह 'या' नेत्यांचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नवी दिल्ली**

सध्या संपूर्ण देशाचे लक्ष लागून असलेल्या हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात आली आहे.या यादीत लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी सरचिटणीस प्रियांका गांधी वड्रा आणि माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुडा यांचा समावेश करण्यात आला आहे. हरियाणा विधानसभेसाठी ०५ ऑक्टोबर रोजी ९० जागांसाठी मतदान होणार आहे तर ०८ ऑक्टोबर रोजी निकाल जाहीर करण्यात येणार आहे.



काँग्रेसकडून जाहीर करण्यात आलेल्या या यादीत पक्षाचे सरचिटणीस रणदीप सुरजेवाला आणि कुमारी सेलजा यांच्या देखील समावेश करण्यात आला आहे. याच बरोबर विनेश फोगट आणि बजरंग पुनिया यांचीही नावे पक्षाच्या स्टार प्रचारकांच्या यादीत समावेश करण्यात आले आहे. तर हिमाचल प्रदेशचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंग सुखू, हरियाणाचे प्रभारी दीपक बाबरिया, राज्य युनिट प्रमुख उदय भान, अजय माकन, बीरेंद्र सिंग, आनंद शर्मा आणि सचिन पायलट यांचा देखील स्टार प्रचारकांमध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच अशोक गेहलोत, भूपेश बघेल, चरणजीत सिंह चन्नी आणि इतर अनेक नेत्यांचाही स्टार प्रचारकांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

तर दुसरीकडे जुलाना येथून यावेळी विनेश फोगट यांना काँग्रेसने तिकीट दिले आहे तर भाजपकडून योगेश बैरागी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर जुलानामधून आम आदमी पार्टीने महिला कुस्तीपटू कविता दलाल यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

## अरविंद केजरीवाल १७७ दिवसानंतर तुरूंगातून बाहेर येणार

### तुरुंगातून बाहेर येण्याचा मार्ग झाला आता मोकळा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नवी दिल्ली**

दिल्लीचे मुख्यमंत्री आणि आम आदमी पार्टीचे (आप) संयोजक अरविंद केजरीवाल यांना मोठा दिलासा मिळाला आहे. दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

गेल्या काही महिन्यांपासून अरविंद केजरीवाल तुरुंगात आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णायामुळे अरविंद केजरीवाल यांचा तुरुगातून बाहेर येण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. काही दिवसांपूर्वी अरविंद केजरीवाल यांच्यावर मद्य धोरण घोटाळा प्रकरणाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहाराचा आरोप केला होता. यावरुन सीबीआयने त्यांना अटक केली होती. यानंतर अरविंद केजरीवाल यांनी या अटकेला आव्हान देणारी आणि जामीन मिळण्यासंदर्भातील अशा दोन स्वतंत्र सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या.या याचिकेवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयात पार पडली होती. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने ५ सप्टेंबरला झालेल्या सुनावणीदरम्यान याचिकेवरील निकाल राखीव ठेवला होता. अखेर याप्रकरणी आज सुनावणी झाली. यावेळी अरविंद केजरीवालांना जामीन मंजूर करण्यात आला. अरविंद केजरीवाल यांना १० लाखांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर सर्वोच्च न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

### अरविंद केजरीवाल हे जवळपास १७७ दिवसानंतर तुरूंगातून बाहेर येणार

अरविंद केजरीवाल हे जवळपास १७७ दिवसानंतर तुरूंगाच्या बाहेर येणार आहेत. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी अरविंद केजरीवाल यांना काही दिवसांसाठी जामीन देण्यात आला होता. प्रचार झाल्यानंतर त्यांना पुन्हा तरूंगात जावे लागले होते. आता त्यांना रितसर जामीन मिळाला आहे.

## आश्रमशाळांना सीसीटीव्हीसाठी १५ दिवसांची मुदत; आदिवासी विकास विभागाचा निर्णय

### सीसीटीव्ही कॅमेरे न बसविल्यास संबंधित आश्रमशाळेवर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ नाशिक**

आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांमधील निवासी विद्यार्थ्यांची सुरक्षा लक्षात घेत सीसीटीव्ही कॅमेरे अनिवार्य करण्यात आले असून त्यासाठी आश्रमशाळांना १५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे. निर्धारित मुदतीत सीसीटीव्ही कॅमेरे न बसविल्यास संबंधित आश्रमशाळेवर कारवाई



करण्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

बदलापूर येथील घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

> विद्यार्थ्यांना त्यांचे हक्क, अडचणी मांडण्यासाठी चाईल्ड लाईन, टोल फ्री क्रमांक तसेच जवळच्या पोलीस ठाण्याचे क्रमांक आश्रमशाळांमध्ये फलकावर लावण्यात आले आहेत.
>
> **– नयना गुंडे (आयुक्त, आदिवासी विकास विभाग)**

वास्तविक, आश्रमशाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे आदेश यापूर्वीच देण्यात आले होते. परंतु, काही आश्रमशाळांमध्ये अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले नाहीत. त्यामुळे प्रशासनाने आश्रमशाळांना १५ दिवसांची मुदत दिली आहे. शाळा आणि वसतिगृहाचे प्रवेशद्वार, मैदान, वर्ग, स्वच्छतागृहाकडे जाणारी वाट, भोजनालय, पायऱ्या, कार्यालय, वाचनालय, प्रयोगशाळा आदी परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या दृष्टिक्षेपात येणार आहे.

सीसीटीव्ही कॅमेरा चित्रणाची आठवड्यातून किमान तीनदा तपासणी केली जाणार आहे. त्यात काही आक्षेपार्ह आढळून आल्यास त्याची चौकशी करून प्रकल्प अधिकारी तसेच स्थानिक पोलिसांकडे तक्रार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सीसीटीव्ही कॅमेऱ्यासाठी आश्रमशाळांमध्ये एक विशेष नियंत्रण कक्ष असणार आहे. आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी इमारतीच्या प्रत्येक मजल्यावर भोंगा बसविण्यात येणार आहे. दरम्यान, शाळा आणि वसतिगृहाच्या दर्शनी भागात चाइल्ड हेल्पलाइन, आदिवासी विकास विभाग मदत कक्ष, टोल फ्री क्रमांक, टेलेमानस, परिसरातील आरोग्य केंद्र, पोलीस ठाणे आदींचे क्रमांक असलेले फलक लावण्यात येणार असल्याची म्देण्यात आली.

राज्यातील ८० टक्क्यांपेक्षा अधिक आश्रमशाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. उर्वरित आश्रमशाळांना सूचना करण्यात आली. याशिवाय, विद्यार्थी सुरक्षेसाठी विशाखा, शाळा व्यवस्थापन, तक्रार निवारण या समित्यांच्या बैठका होत असतात.

### कंत्राटी कर्मचाऱ्यांना चारित्र्य पडताळणी अनिवार्य

आश्रमशाळांमध्ये नियमित कर्मचाऱ्यांबरोबरच बाह्यस्त्रोतांद्वारे तसेच कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली जाते. यापुढे कंत्राटी कर्मचाऱ्यांना स्थानिक पोलीस यंत्रणेमार्फत चारित्र्य पडताळणी करणे बंधनकारक राहणार आहे. नियुक्त कर्मचाऱ्याची छायाचित्रासह सर्व माहिती स्थानिक पोलिसांना सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

## प्रचाराच्या नियोजनापासून सर्व जबाबदारीसाठी भाजपाच्या सहा शिलेदारांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई**

विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपच्या राज्यातील सहा नेत्यांवर विशेष जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रचाराच्या नियोजनापासून सर्व जबाबदारी त्यांच्यावर असेल.



विदर्भ – प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, मराठवाडा – खा. अशोक चव्हाण, कोकण – मंत्री रवींद्र चव्हाण, पश्चिम महाराष्ट्र – केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उत्तर महाराष्ट्र – मंत्री गिरीश महाजन, मुंबई – आ. आशिष शेलार या नेत्यांवर विभागनिहाय जबाबदारी असेल. निवडणुकीसाठीच्या समन्वय समितीचे अध्यक्ष माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे हे आहेत. पक्षाचे दिल्लीतील मुख्यालय आणि मुंबईतील प्रदेश कार्यालयाने दिलेल्या कार्यक्रमांची अंमलबजावणी हे नेते करतील.

**१६० जागा लढणार**

भाजपने २०१४ च्या निवडणुकीत १२२ जागा जिंकल्या. २०१९ मध्ये हा आकडा १०५ झाला. यावेळी भाजप १६० जागा महायुतीमध्ये लढेल असे म्हटले जाते. त्यापैकी १२५ जागा जिंकण्याचे उद्दिष्ट पक्षाने ठेवले आहे. नवरात्र उत्सवाच्या काळात किमान ५० उमेदवार जाहीर करण्याचा भाजपचा प्रयत्न असेल. महायुतीच्या जागा वाटपाला नवरात्रातच अंतिम स्वरुप दिले जाईल, असे पक्षाच्या ज्येष्ठ नेत्याने सांगितले.

## राज्यात २५० तुरुंगाधिकाऱ्यांची पदे रिक्त; दहा वर्षांपासून भरतीच नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

राज्याच्या कारागृहांमध्ये तुरुंगाधिकारी श्रेणी–२ची तब्बल २५० पदे रिक्त आहेत. हे पद कार्यकारी असल्यामुळे कारागृहातील सुरक्षा, न्यायालयीन आणि दैनंदिन प्रशासकीय कामकाज खोळंबत असल्याचे वास्तव आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून तुरुंगाधिकारी या पदाची पदभरती घेतली जाते. मात्र दहा वर्षांपासून भरतीप्रक्रिया राबविण्यात आली नसल्याची माहिती आहे.

गृह विभागाने २०१४ पासून तुरुंगाधिकारी श्रेणी–२ या पदभरतीला मंजुरी प्रदान केली नाही. त्यामुळे तुरुंगाधिकारी पदभरती परीक्षेच्या प्रतीक्षेत अनेक युवकांनी वयोमर्यादा ओलांडली आहे. मात्र गृहविभागाकडून याबाबत सकारात्मक विचार केला जात नाही, असे दिसून येते. राज्यात एकूण ६० कारागृहे आहेत. यात नऊ मध्यवर्ती कारागृहे, ३१ जिल्हा कारागृहे, १९ खुली कारागृहे आणि एक महिला कारागृह आहेत. या सर्व कारागृहांची एकूण बंदीक्षमता २७ हजार ११० असून, कारागृहात प्रत्यक्षात ४१ हजार ७५०



कैदी बंदिस्त आहेत. तुरुंगाधिकाऱ्यांची पदे रिक्त असल्याबाबत कारागृह प्रशासनाच्या मुख्यालयाचे प्रमुख डॉ. जालिंदर सुपेकर यांच्याशी संपर्क साधला असता ही पदे रिक्त आहेत; पण नेमकी किती हे सांगता येणार नाही, असे ते म्हणाले.

**ना जाहिरात, ना पदभरती**

एमपीएससीमार्फत तुरुंगाधिकारी पदासाठी परीक्षा घेणे अपेक्षित आहे. मात्र पदभरतीला गृह विभागाकडून मान्यता मिळाली नाही. 'तारीख पे तारीख' सुरू आहे. ना जाहिरात, ना परीक्षा पुढे निवड कधी होणार हे सांगणे कठीण आहे. प्रशिक्षणाचा तर प्रश्न येत नाही. त्यामुळे या पदभरतीच्या प्रतीक्षेत असलेल्या बेरोजगार तरुणाईच्या स्वप्नावर विरजन येत असल्याचे चित्र आहे.

**एडीजी, तीन डीआयजीचे पदे रिक्त**

गृह विभागाच्या कारागृह प्रशासनाचा कारभार रामभरोसे सुरु असल्याचे दिसून येते. कारागृह प्रशासनात अतिरिक्त पोलिस महासंचालक (एडीजी) हे पद रिक्त आहेत. तीन विशेष पोलिस महानिरीक्षक (डीआयजी) पदाचा प्रभारी कारभार सुरू आहे. सीआयडीचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रशांत बुरडे यांच्याकडे कारागृह प्रशासनाच्या एडीजी पदाची धुरा सोपविली आहे.

## मोदी-शाहंकडून पोर्ट ब्लेअरचे नामकरण 'श्री विजय पुरम' म्हणून ओळखले जाणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३नवी दिल्ली**

पोर्ट ब्लेअरचे नामकरण करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून, आता पोर्ट ब्लेअर 'श्री विजय पुरम' या नव्या नावाने ओळखले जाणार आहे. खुद्द गृहमंत्री अमित शहा यांनी ही माहिती दिली आहे. आम्ही पोर्ट ब्लेअरचे नाव बदलून श्री विजय पुरम करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एका पोस्टमध्ये शाह यांनी ही माहिती दिली आहे. देशाला गुलामगिरीच्या सर्व प्रतीकांपासून मुक्त करण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या संकल्पाने प्रेरित होऊन आज गृह मंत्रालयाने पोर्ट ब्लेअरचे नाव 'श्री विजयपुरम' ठेवण्याचा निर्णय घेतल्याचे शाहंनी म्हटले आहे.श्री विजय पुरम हे नाव आपला स्वातंत्र्यलढा आणि त्यात अंदमान निकोबारचे योगदान दर्शवते. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यात आणि इतिहासात या बेटाला अनन्यसाधारण स्थान आहे. चोल साम्राज्यात नौदल तळाची भूमिका बजावणारे हे बेट आज देशाच्या सुरक्षा आणि विकासाला गती देण्यासाठी सज्ज झाले असल्याचे शाहंनी म्हटले आहे.

## संपादकीय ......

# राजकीय समीकरणावरून खल

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर देशाचे राजकारण वेगाने बदलले आहे. राजकीय तज्ज्ञांनी, पक्षांनी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा वेगळे निकाल लागले आणि लोकसभेला एकट्या जीवावर बहुमत मिळवत सरकार स्थापन करण्याचे भाजपचे स्वप्न भंगले. पुन्हा एकदा आघाडी सरकारचे पर्व सुरू झाले. तिसर्यांदा भाजप आघाडी सत्तेवर आल्यानंतरच्या देशभरातील राजकीय घडामोडी पाहिल्या, तर मोदी सरकारची राजकीय अपरिहार्यता प्रकर्षाने समोर आली.

लॅटरल एंट्रीवर यूटर्न किंवा वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकाला संयुक्त संसदीय समितीकडे पाठविण्याचा मुद्दा किंवा पेन्शनचा मुद्दा असो, शिवाय अर्थसंकल्पात बिहार आणि आंध्र प्रदेशची विशेष काळजी घेतलेली असो. या सर्व घटना पाहता विरोधकांनी भाजपला घेरले आहे. भाजपला बहुमतापेक्षा कमी म्हणजे २४० जागा मिळाल्या. त्यामुळे केंद्रात राहण्यासाठी भाजपला घटक पक्षांना सांभाळून घ्यावे लागत असून त्याचे परिणाम दिसत आहेत; पण भाजप मात्र पूर्वीच्याच रणनीतीनुसार काम करत असल्याचा दावा करत आहे. सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करण्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे धोरण असल्याचे भाजप नेते म्हणत आहेत. तज्ज्ञांच्या मते, आघाडी सरकारची काहीअंशी हतबलता अपरिहार्य असते; पण आताच एखाद्याच्या मतावर शिक्कामोर्तब करणे घाईचे होऊ शकते. लोकसभेच्या निकालाने विरोधी पक्षाच्या उत्साहाला भरते आले आहे. या बळावर विरोधक केंद्र सरकार आणि भाजपवर दबाव आणण्याची एकही संधी सोडताना दिसत नाही. संसदेपासून ते रस्त्यांपर्यंत काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांत नवे चैतन्य निर्माण झाले आहे. आंदोलनाची धार अधिक तीव्र होताना दिसत आहे. नीट परीक्षा, जातिनिहाय आधारित जनगणना असो या मुद्द्यांवर विरोधक सत्ताधार्यांवर दबाव आणण्यात यशस्वी ठरले आहेत. प्रसंगी काही वेळा अप्रत्यक्षपणे भाजपच्याच घटक पक्षांची साथही मिळाली आहे. उदा. वक्फ बोर्ड दुरुस्ती विधेयकाला जेपीसीकडे पाठविण्याची मागणी 'एनडीए'च्या घटक पक्ष असलेल्या टीडीपीने केली होती. यानुसार 'लॅटरल एंट्री'वरून विरोधकांच्या सुरात नितीशकुमार यांच्या जेडीयूने आणि चिराग पासवान यांच्या पक्षाने सूर मिसळल्याचे चित्र होते. विरोधी पक्षांच्या आघाडीतील एका नेत्याच्या मते, गेल्या काही वर्षांत भाजप प्रथमच दबावाखाली वावरत असल्याचे दिसले आहे. अशा स्थितीत दबाव कमी झाला, तर भाजप पुन्हा वापसी करू शकतो. साहजिकच विरोधकांकडून हल्लाबोल सुरूच राहील. अर्थात, मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार आणि भाजपकडून विरोधकांच्या रणनीतीला प्रत्युत्तर दिले जाईल, हे विरोधकांना चांगलेच ठाऊक आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र, हरियाणा, झारखंड, जम्मू आणि काश्मीर विधानसभा निवडणुका महत्त्वाच्या ठरत आहेत. कदाचित या राज्यांचे निकाल विरोधकांच्या बाजूने लागले, तर भाजपवर दबाव वाढविणे आणखी सोपे राहील, हे विरोधकांना चांगलेच ज्ञात आहे; मात्र भाजपची कामगिरी चांगली राहिली, तर विरोधकांसाठी पुढचा मार्ग खडतर राहू शकतो. म्हणूनच विरोधक विधानसभा निवडणुकीकडे गांभीर्याने पाहत आहेत.

विरोधक भाजपला कोणत्याही बाबतीत ढील देऊ इच्छित नाही. काँग्रेस नेत्यांच्या मते, काँग्रेस विधानसभा निवडणुकीत घटक पक्षांशी आघाडी करताना आपले हित बाजूला ठेवण्यासाठी तयार आहे. जम्मू-काश्मीरमध्ये काँग्रेसने हेच धोरण अंगीकारले. नॅशनल कॉन्फरन्सच्या तुलनेत काँग्रेस पक्ष कमी जागांवर लढत आहे. याप्रमाणे लोकसभा निवडणुकीच्या काळात महाराष्ट्रात चांगली कामगिरी केल्यानंतरही काँग्रेस मात्र आघाडी पक्षांसमवेत जागावाटपावेळी लवचिक भूमिका घेताना दिसत आहे. याबाबत पक्षांतर्गत प्रश्न उपस्थित केले जात असताना त्यावर पक्षश्रेष्ठींनी काही तर्क मांडले. या राज्यांत विरोधकांच्या पदरात विजय पडत असेल, तर आगामी काळात काँग्रेसलाच चांगला फायदा होणार आहे आणि भाजपची उलटी गिणती सुरू होईल, असा दावा काँग्रेस श्रेष्ठींनी केला आहे.

# सोशल मीडिया प्लॅटफार्मवर सायबर पोलिसांचा वॉच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती** : गणेशोत्सवासह आगामी सण, उत्सवाच्या काळात सोशल मीडिया प्लॅटफार्मवरील प्रत्येक पोस्टवर पोलीस आयुक्तालयातील सायबर ठाण्याचा वॉच आहे. त्यासाठी सायबर ठाण्यातील सोशल मॉनिटरिंग सेल २४ बाय ७ ॲक्टिव्ह करण्यात आला आहे. कम्युनिटी पोलिसिंग अंतर्गत त्याबाबत जनजागृती करणारी भित्तिपत्रके गणेश मंडळांना वितरित करण्यात येत आहेत. पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी त्याबाबत सायबर पोलिसांना निर्देश दिले आहेत.

सोशल मीडियावरील अफवा, आक्षेपार्ह पोस्टमुळे कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण



होऊ शकतो. त्यामुळे सण, उत्सवादरम्यान एखाद्या व्हायरल पोस्टमुळे कायदा व सुव्यवस्था बिघडू नये, यासाठी पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सायबर ठाण्यातील सोशल मॉनिटरिंग सेल अधिक प्रभावी केला आहे. पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर यांच्या मार्गदर्शनात सायबरचे ठाणेदार पुनीत कुलट व त्यांची टीम सोशल मीडियावरील फेक न्यूज, आक्षेपार्ह पोस्ट, अफवांवर वॉंचठेवून आहेत. आता सोशल मीडिया महत्त्वाचे माध्यम झाले आहे. अलीकडे तर त्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. कोणतीही बातमी काही मिनिटांत मोठ्या समुदायापर्यंत पोहोचत असते. अनेकजण आलेल्या माहितीची खातरजमा करण्याचे कष्ट न घेता ती पुढे पाठविण्याचे काम करतात. परंतु, सोशल मीडियावरील माहिती पुढे पाठविताना काळजी घ्या, अन्यथा एखादी पोस्ट तुम्हाला चांगलीच महागात पडणार आहे. आता तुमच्या प्रत्येक पोस्टवर लक्ष ठेवण्याचे काम सायबर पोलिसांनी सुरू केले आहे.

> धार्मिक भावना दुखावतील असा मजकूर, फोटो, किडीओ तयार करून पोस्ट करणे, शेअर वा लाइक करणे, हा दखलपात्र गुन्हा आहे. कुणीही अफवा पसरवू नये. असे कृत्य आढळूनआल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.-**पुनीत कुलट, ठाणेदार, सायबर पोलीस स्टेशन**

# नेरपिंगळाई येथील ऐतिहासिक वारसा लाभलेला गणेशोत्सव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ नेरपिंगळाई-** राज्यभरातील लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या पिंगळादेवी गडाच्या पायथ्याशी वसलेल्या नेरपिंगळाई गावातील गणेशोत्सवाला ऐतिहासिक वारसा आहे.

धर्म आणि राजकारण यांची योग्य सांगड घालणाऱ्या आणि संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत अच्युत महाराज यांच्यासह देशाच्या विविध भागांतील संत महात्म्यांच्या पावन स्पर्शाने पावन झालेल्या भूमीत गणेश उत्सवाचा सोहळा थाटात साजरा



होत आला आहे. श्री संत गुलाबपुरी महाराज, ज्वालागिरी महाराज, वीरशैव मठ या धार्मिक स्थळांपैकी वीरशैव मठावर दरवर्षी गणेशोत्सव साजरा होतो. पंचक्रोशीतील या सर्वात मोठ्या उत्सवात दहा दिवस लगतच्या सर्व गावातील दिंड्या या उत्सवात हजेरी लावतात. इसवी सन ९६३ साली या मठाची स्थापना झाली. गणेश विसर्जनाचा पहिला मानही परंपरेने याच गणपतीला चालत आला आहे. ढोल- ताशाच्या निनादात 'श्रीं'च्या विसर्जनाची मिरवणूक निघते.

# भाजीपाला पिकावरील विविध कीड व रोगांचे असे करा नियंत्रण

**विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या सर्वत्र ढगाळ वातावरण आहे त्यातच काही भागात संततधार पाऊस देखील आहे. यामुळे भाजीपाला पिकांवर विविध कीड रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे.

याच अनुषंगाने जाणून घेऊया टोमॅटो, वांगी, भेंडी, कांदा पिकावरील विविध कीड व रोगांचे नियंत्रण कसे करावे याबाबत कृषि तज्ज्ञांचा पीक व्यवस्थापन सल्ला.

**टोमॅटो पिकावरील रस शोषणाऱ्या किडींचे नियंत्रण**

टोमॅटो पिकावर येणाऱ्या रस शोषणाऱ्या किडींचे नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड ४ मि.ली. किंवा डायमेथोएट १० मि.ली. किंवा ाक्झिडिमेटॅान मिथाईल १० मि.ली. किंवा थायोमेथोक्झाम ४ ग्रॅम १० लिटर पाण्यातून आलटून पालटून फवारावे.

**टोमॅटो पिकावरील फळ पोखरणाऱ्या किडींचे नियंत्रण**

टोमॅटोवरील फळ पोखरणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी एचएएनपीव्ही १० मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन ५ मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारावे.

**टोमॅटो पिकावरील करपा व भुरी रोगाचे नियंत्रण**

टोमॅटोवरील करपा व भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी मँकोझेब (७५ डब्ल्यू पी) २५ ग्रॅम व टेब्यूकोनॅझोल (२५ इसी) ५ मि.ली. १० लिटर

कृषी विशेष

पाणी या प्रमाणात पंधरा दिवसाच्या अंतराने दोन फवारण्या अलटून-पालटून कराव्यात.

**वांगी पिकावरील फळे पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रण**

वांगी पिकावरील फळे पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफॉस २० मि.ली. किंवा ट्रायझोफॉस २० मि.ली. किंवा स्पिनोसॅड ४ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.



टोमॅटो, वांगी, कांदा, भेंडी पिकावरील रोगांचे नियंत्रण

वांगी पिकावरील फळकुजव्या तसेच पानावरील ठिपके रोगाचे नियंत्रण

वांगी पिकावरील फळकुजव्या तसेच पानावरील ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी मॅन्कोझेब २५ ग्रॅम किंवा कार्बेंडेझिम १० मि.ली. १० लिटर पाण्यातून फवारावे.

**वांगी पिकावरील भुरी रोगाचे नियंत्रण**

वांगी पिकावरील भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात मिसळणारे गंधक २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

**कांदा पिकावरील फुल किड्यांचे नियंत्रण**

कांदा पिकावरील फुल किड्यांच्या नियंत्रणासाठी प्रोफेनोफॅास १० मि.ली. किंवा सायपरमेथ्रीन (२५%) ५ मि.ली. किंवा डेल्टामेथ्रीन (१ इसी) २० मि.ली. किंवा कार्बोसल्फान १० मि.ली. प्रति दहा लिटर पाण्यातून पंधरा दिवसाच्या अंतराने आलटून पालटून फवारावे.

कांदा पिकावरील जांभळा करपा रोगाचे नियंत्रण

कांद्यांवरील जांभळा करपा रोगाच्या नियंत्रणासाठी मँकोझेब २५ ग्रॅम किंवा कार्बेंडेंझिम १० मि.ली. किंवा क्लोरोथॅलोनील २५ मि.ली. + १० मि.ली. चिकट द्राव १० लिटर पाण्यातून पंधरा दिवसाच्या अंतराने फवारावे.

**भेंडी पिकावरील रस शोषणाऱ्या किडींचे नियंत्रण**

भेंडी पिकावरील रस शोषणाऱ्या किडींच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड ४ मि.ली. प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

भेंडी पिकावरील भुरी रोगाचे नियंत्रण

भेंडीवरील भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी डिनोकॅप १० मि.ली.प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे.

भेंडी पिकावरील ठिपके रोगाचे नियंत्रण

भेंडीवरील ठिपके रोगाच्या नियंत्रणासाठी मँकोझेब २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून १५ दिवसाच्या अंतराने गरजेनुसार फवारावे.

**संकलन**
**डॉ. कल्याण देवळाणकर**
निवृत्त कृषि विद्यापीठ शास्त्रज्ञ




# फायदे खजूर सेवनाचे

**दि.१३विदर्भ प्रजासत्ताक**

खजूरामध्ये कोलेस्ट्रॉल नसते तसेच त्यात चरबीचे प्रमाणही अत्यंत कमी असते. खजूर लॅक्साटिव्ह फूड प्रकारातील आहे. त्यात खूप अधिक प्रमाणात विरघळणारे तंतुमय पदार्थ असतात. त्यामुळे पचनक्रिया चांगली राहण्यास मदत होते. खजूर रात्रभर भिजवून ठेवून सकाळी त्या पाण्यासह खाल्ल्यास खजुराचा अत्याधिक फायदा होतो. त्यामुळे पोट साफ होण्यास मदत होते.



**रक्ताल्पतेत फायदा :** खजुरात लोहाचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे खजूर खाल्ल्याने रक्त वाढते. जेव्हा रक्ताल्पता किंवा ॲनिमियाची कमतरता भासते तेव्हा खजुराचे नियमित सेवन केल्यास खूप खजूर हा जीवनसत्त्व आणि खनिजे यांचा उत्तम स्त्रोत आहे. त्यात कॅल्शियम, लोह, फॉस्फरस, सोडियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि झिंक यांच्यासारखे आवश्यक खनिजे असतात तसेच थियामिन, रिवोफ्लेविन, नियासीन, फॉलेट, ए जीवनसत्त्व आणि क जीवनसत्त्व आढळते. फायदा होतो.

**ॲलर्जीपासून बचाव :** ऑरगॅनिक सल्फर हे खूप कमी खाद्यपदार्थांमध्ये असते. खजुरामध्ये ते मुबलक आढळते. त्यामुळे ऋतुमानातील बदल आणि ॲलर्जिक रिॲक्शन या सर्व धोक्यांपासून बचाव करण्यासाठी खजूर लाभदायक ठरतो.

**हृदयाचे आरोग्य :** खजुरात भरपूर प्रमाणात पोटॅशिअम आणि सोडियम खूप कमी प्रमाणात असते. त्यामुळे आपल्या मज्जा संस्था आणि हृदयाचे आरोग्य राखण्यास फायदा होतो.


**ऊर्जावृद्धी :** खजुरात ग्लुकोज, सुक्रोज आणि फ्रक्टोजसारखी नैसर्गिक शर्करा असते ज्यामुळे ऊर्जा वाढवण्यास मदत होते. खजुरात कॅलरीजचे प्रमाण कमी असते. त्यामुळे वजन आणि तंदुरुस्तीचा विचार करणाऱ्या लोकांसाठी खजूर उपयुक्त आहे.

**हाडांची बळकटी :** खजुरामध्ये सेलेनियम, कॉपर आणि मॅग्नेशियम हाडांना मजबूत आणि तंदुरुस्त बनवते. मुलांना डेट मिल्क म्हणजेच खजूर आणि दूध असे एकत्र करून मिक्सरमधून फिरवून दिल्यास त्यांची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

# उत्कृष्ट गणेश मंडळांना महापालिकेतर्फे पुरस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती** : राज्य शासनाप्रमाणेच उत्कृष्ट गणेश मंडळांना महानगरपालिका स्तरावरही पुरस्कार देण्यात येणार आहे. त्यासाठी नोंदणीकृत सार्वजनिक गणेश मंडळांनी संपर्क करण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे. महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी राबविलेले पर्यावरणपूरक उपक्रम, जनजागृती आदी बाचीचे मूल्यमापन करून पुरस्कार देण्यासंदर्भातील बाय विचाराधीन आहे. सदर स्पर्धेत



महानगरपालिकेची परवानगी घेतलेल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सहभागी होता येईल. उत्कृष्ट गणेशमंडळांची पुरस्काराकरिता निवड करण्यास्तव पर्यावरणाशी संबंधित विविध क्षेत्रात कार्यरत व्यक्तींची मूल्यमापन समिती गठीत करण्यात आली आहे. पर्यावरणपुरक मूर्ती सजावटीकरिता प्लास्टीक व थर्माकोलचा वापर न करणे, पर्यावरणाशी संबंधित देखावा, पर्यावरण संवर्धनाबाबतचे संदेश, स्वच्छता आदी निकषांच्या आधारे मूल्यमापन करण्यात येणार आहे. प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास ५१ हजार रूपये, व्दितीय क्रमांकाच्या विजेत्यास्र २१ हजार व तृतीय क्रमांकाच्या विजेत्यास ११ हजार रूपये रोख व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

# उपायुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी केली छत्री तलाव व प्रथमेश तलावाची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१२अमरावती**

श्री गणेशोत्सव निमित्त श्री गणेश विसर्जन च्या अनुषंगाने मा.उपायुक्त (प्रशा.) डॉ.मेघना वासनकर यांनी गुरुवार रोजी पुर्व झोन क्र.३ दस्तूरनगर अंतर्गत येणाऱ्या छत्री तलाव येथील कृत्रिम तलाव व प्रथमेश तलावाची पाहणी केली.

या पाहणी दरम्यान सहाय्यक आयुक्त दिप्ती गायकवाड़, वैद्यकीय अधिकारी डॉ.अजय जाधव, अग्निशमन अधिक्षक अजय पंधरे, उपअभियंता नितिन बोबड़े, ज्येष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, जे.ई. चैतन्य काळे, स्वास्थ निरीक्षक प्रसाद कुलकर्णी, मिथुन वाघमारे, सुपरवाइजर, सफाई कामगार उपस्थित होते. छत्री तलाव व प्रथमेश तलाव येथे मोठ्या प्रमाणात गणेश विसर्जनासाठी मोठ्या प्रमाणात नागरीक येत असतात. या ठिकाणी करण्यात येणा-या कार्याची पाहणी उपआयुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी केली.

उपआयुक्त डॉ.मेघना वासनकर यांनी निर्देश दिले की, गणेशोत्सव मार्गांची दैनंदिन साफ सफाई व आरोग्य विषयक दैनंदिन फवारणी करावी, विसर्जन ठिकाणी निर्माल्याकरीता स्वतंत्र व्यवस्थापन करावे, विसर्जन स्थळी मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करणे, विसर्जन स्थळी प्राथमिक आरोग्य पथक अँम्बुलंन्स सह सज्ज ठेवणे तसेच विसर्जन स्थळी आवश्यक ठिकाणी पाण्यावरील गाळ व कचरा काढावा. आर्टीफिशीयल टँक ठेवण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. अग्निशमन विभागाला विसर्जन स्थळी अग्निशमन पथक सज्ज ठेवण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले.



RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. १३ सप्टेंबर २०२४ शहर/ग्रामिण


## वनविभागाने चारा, पाणी बंद केल्याने अनेक मेंढ्या दगावल्या

### संतोष महात्मे च्या नेतृत्वात मेंढपाळ धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१३ अमरावती**

वनविभागाच्या काही भ्रष्ट व मुजोर अधिकाऱ्यांमुळे मेंढपाळ धनगरांना वारंवार नाहक त्रास देण्यात येत आहे. .चांदुर रेल्वे भागात परंपरागत अधिवास करणाऱ्या मेंढपाळांना वनविभागाच्या काही भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या उपदव्यापामुळे मरणाच्या यातना होत आहे. त्यांच्या मेंढ्यांचा चारा व पाणी बंद करण्यात आल्याने उपासमारीमुळे काही मेंढ्या दगावल्या.त्यामुळे संतप्त झालेल्या मेंढपाळानी संतोष महात्मे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत वनविभागाच्या मुजोर अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली अन्यथा मेंढपाळ धनगर विकास मंचच्या वतीने राहुटी आंदोलन उभारल्या जाईल, व या करिता वनविभाग सर्वस्वी जबाबदार राहील असा इशाराही देण्यात आला.

मागील पाच सहा पिढ्यापासून पावसाळ्यातील चार महिन्याकरिता चांदुर रेल्वे या भागात वास्तव्यात असलेल्या मेंढपाळांना जाणीवपूर्वक त्रास दिल्या जात आहे. काही भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे जर असंतोष वाढत असेल, तर त्याबाबत काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. आपणास विनंती की मेंढपाळांना चांदुर रेल्वे भागातील सावंगा विठोबा येथे वनविभागाच्या काही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या धोरणामुळे मुळे मेढ्या मृत झालेल्या प्रकरणात व त्या परीसरातील शेतकरी, गावकरी त्यांना १०० वर्षापासून एकोप्याने राहणाऱ्या मेंढपाळांच्या विरोधात वन विभाग जाणीवपूर्वक तक्रारी करायला सांगून मेंढपाळांच्या विरोधात त्यांचे माथळे खराब केल्यानंतर ते गावकरी मेंढपाळांना मारहाण करण्याचा प्रयत्न करतात. ज्या प्रकारामध्ये एखाद्याची जिवित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. ह्या होत असलेल्या त्रासाबाबत तत्काळ चौकशी करण्यात येऊन यासंदर्भात दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. अन्यथा मेंढपाळ धनगरांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष वाढेल. असे ही निवेदनात स्पस्ट केले आहे.प्रायोगिक तत्त्वावर अर्धबंदिस्त मेंढी पालन प्रकल्प, या मेंढपाळांकरिता चराऊ जमीन देण्याबाबत राज्य सरकार कडून निर्देश दिलेले होते. या मेंढपाळ धनगरांना स्थैर्य देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन पुढाकार घेत आहे. याबाबतीत मंत्रालयीन स्तरावर वरिष्ठ अधिकाऱ्यासमवेत झालेल्या बैठकीमध्ये काही उपाययोजना सुचविण्यात आलेल्या होत्या ज्यामध्ये अर्धबंदिस्त मेंढी पालन प्रकल्प, काही वनक्षेत्र जमिनीवर कालबद्ध पद्धतीने चारा लागवड करून मेंढपाळांना चारा उपलब्ध करून देण्याविषयी ठरलेले होते. परंतु याबाबत वनविभगाने कुठलीही कार्यवाही केलेली नाही. वेळ काढूपणाचे धोरण अवलंबित असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात यावी व मेंढपाळांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्या कडे करण्यात आली आहे. यावेळी संतोष महात्मे सह जिल्हाध्यक्ष जानराव कोकरे,हरिभाऊ शिंदे,गोमा पोकळे,बंडू शिंदे,संजय गोफणे,सह अनेक धनगर बांधव उपस्थित होते.

## शिळ्या, उरलेल्या अन्नाच्या विल्हेवाटीसाठी अन्नाची कदर शेतकऱ्यांचा आदर

### पर्यावरणपूरक उपक्रम, जनजागृतीसाठी सर्वांनी प्रयत्न करावे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ अमरावती**

'अन्नाची कदर, शेतकऱ्यांचा आदर' हा स्वच्छता,आरोग्य व पर्यावरणास पूरक ठरणारा उपक्रम कौतुकास्पद असून, ही भावना अधिकाधिक वाढीस लागून जागरूकता निर्माण व्हावी, याकरिता सर्वांनी प्रयत्नरत रहावे, असे मत मनपाच्या सहायक आयुक्त दीप्ती गायकवाड यांनी व्यक्त केले.

या उपक्रमासाठी गुरुवारी छत्री तलाव नजीकच्या उड्डाणपुलाजवळ खड्डा खोदण्यात आला. या खड्ड्याचे पूजन करताना गायकवाड बोलत होत्या. गणेशोत्सव, महालक्ष्मी आणि त्यानंतर येणाऱ्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी महाप्रसाद होतात. या महाप्रसादानंतर शिल्लक राहिलेल्या अन्नाची योग्य मार्गाने विल्हेवाट लावण्यासाठी एमएच २७ एटीएस ग्रुप्सतर्फे हा उपक्रम सात वर्षांपासून सुरळीत सुरू आहे. या वेळी, सर्वात आधी सहायक आयुक्त दीप्ती गायकवाड व जागरूक नागरिक संदीप गुल्हाने यांच्या हस्ते धरती मातेचे व अन्न देवतेचे पूजन करून गोळा केलेले अन्न धरती मातेला अर्पण करण्यात आले. या वेळी दस्तूर नगर झोन कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी नरेंद्र देवरणकर, ज्येष्ठ स्वास्थ्य निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ्य निरीक्षक धनिराम कलोसे, प्रसाद कुलकर्णी, मनीष हडाले, योगेश कंडारे, मनीष नकवाल, धर्मेंद्र ढिके, मुन्ना महल्ले, पृथ्वी पांडे, ऋग्वेद घुरडे, किशोर कडू आदी उपस्थित होते.

पहिल्याच दिवशी प्रतिसाद स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणास पूरक ठरणाऱ्या या उपक्रमाला पहिल्याच दिवशी प्रतिसाद मिळाला. शहरातील जागरूक व स्वच्छताप्रिय नागरिकांनी प्रमोद पांडे ८९७५५२६९६८ यांच्याशी संपर्क साधला. त्यानंतर अन्न संकलित करण्यात आले. आधी गरजू आणि भुकेल्यांना सन्मानाने अन्न देण्यात आले. त्यानंतर उरलेले अन्न आज छत्री तलाव पुलालगत धरती मातेला अर्पण करण्यात आले.

## रिक्षाचालकांसाठी धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळाची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ अमरावती,** राज्य शासनातर्फे धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मीटर टॅक्सीचालक कल्याणकारी मंडळ स्थापना करण्यात आली आहे.ऑटो-रिक्षा परवानाधारक, ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांसाठी सामाजिक सुरक्षा आणि कल्याणकारी योजनेंतर्गत जीवन विमा अपंगत्व विमा योजना, आरोग्य विषयक लाभ, कर्तव्यावर असताना दुखापत झाल्यास ५० हजारापर्यंत अर्थसहाय्य योजना, पाल्याच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना, कामगार कौशल्यवृद्धी योजना, ६५ वर्षावरील ऑटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी परवानाधारक यांना निवृत्ती सन्मान योजनेंतर्गत सानुग्रह अनुदान, नवीन ऑटोरिक्षा मिटर्ड टॅक्सी खरेदी, गृह खरेदीसाठी घेण्यात येणारे कर्ज इत्यादी, ऑटोरिक्षा परवानाधारक ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांसाठी केंद्र शासन आणि राज्य शासनामार्फत रावण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना राबविणे. मंडळाच्या कल्याणकारी निधीचे विनियोजन व व्यवस्थापन करणे इत्यादी मंडळाचे उदिष्टे



आहे.मंडळाच्या योजनांच्या लाभासाठी ऑटो-रिक्षा परवानाधारक, ऑटो-रिक्षा आणि मिटरटॅक्सी चालकांनी मंडळाकडे नोंदणी करणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील परिवहन कार्यालयामार्फत याबाबतची नोंदणी प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. नोंदणीकृत चालकांना लाभ देण्यासाठी मंडळाच्या जिल्ह्यातील कार्यालयाकडून ओळखपत्र जारी करण्यात येणार आहे. मंडळाचा सभासद होण्यासाठी अर्जदाराने राज्यामध्ये नोंदणी असलेल्या ऑटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी अनुज्ञप्ती व बॅज धारण केले असणे बंधनकारक राहिल. पात्र अर्जदाराच्या कुटुंबातील व्यक्ती मंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र असतील. तथापि, कुटुंबातील सदस्य संख्या ही मुले मिळून ४ पर्यंत मर्यादित राहणार आहे.सभासद सलग एक वर्षापेक्षा जास्त काळ मंडळाची वर्गणी अथवा मंडळानी विहीत केलेली इतर रक्कम मंडळाकडे अदा करणार नाही, अशा सभासदाचे सभासदत्व सुनावणीची एक संधी देऊन रद्द करण्यात येणार आहे. परवानाधारक अपंग झाल्यास तो परवानाधारक देखील कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र राहील. परवानाधारकाचा मृत्यू झाल्यास त्याची अनुज्ञप्ती त्याच्या कायदेशिर वारसास हस्तांतरीत करण्यात येणार आहे. मयत परवानाधारकाला कायदेशीर वारस त्याच्याकडे अनुज्ञप्ती, बॅज नसेल तर सदर कायदेशीर वारस कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र राहिल.नोंदणी शुल्क आणि ओळखपत्र शुल्काची रक्कम रूपये ५०० राहणार आहे. सदर नोंदणी शुल्क अर्जासोबत जमा करण्यात येणार आहे. तसेच नोंदणी शुल्क आणि ओळखपत्र शुल्काची रक्कम राज्यस्तरीय मंडळांनी निश्चित केल्याप्रमाणे असणार आहे. वार्षिक सभासद शुल्क रक्कम ३०० राहणार आहे. तसेच वार्षिक सभासद शुल्काची रक्कम राज्यस्तरीय मंडळांनी वेळोवेळी निश्चित केल्याप्रमाणे असेल.ऑटो रिक्षा व मिटर्ड टॅक्सी परवानाधारकांनी कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

## धामंत्रीमार्गे वळवण्यासाठी सरपंचासह नागरिकांनी रोखली चक्क एसटी बस

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ तिवसा-** एसटी बस धामंत्रीमार्गे वळवण्यासाठी गुरुवारी नागरिकांनी चक्क एसटी बस रोखून धरली. तिवसा येथून दुपारी १२.३० वाजताची एक बसफेरी तिवसा-चिंधाई फाटा-भारसवाडी-आखतवाडा (मार्गे कुऱ्हा) अशी धावते. ही बस गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. मात्र या फेरीने धामंत्री येथील विद्यार्थी व प्रवाशांना चिंधाई फाट्यावरून एक-दीड किलोमीटर पायी जावे लागते. पाऊस आणि उन्हात पायी ये-जा करावी लागत असल्याने ही नियोजित फेरी धामंत्री मार्गे वळवण्यात यावी अशी संबंधितांची मागणी आहे. त्यासाठी चिंधाई फाट्यावर सरपंचासह नागरिकांनी हे आंदोलन केले.

दुपारी सुटणारी ही एसटी बस धामंत्री, उबरखेड अशी केल्यास विद्यार्थी व प्रवाशांना सोयीचे होते. ऊन, पावसाचा त्रास सहन करावा लागणार नाही. ती बस भारसवाडी, आखतवाडा न पाठवता ती धामंत्री मार्गे झाल्यास फायदेशीर राहू शकते. याबाबत सरपंच व गावकऱ्यांच्या सह्यांचे निवेदन



देण्यात आले होते. मात्र एसटी महामंडळाने नियोजित फेऱ्या व टायमिंगचा ताळमेळ जुळत नसल्याने तसेच भारसवाडी, आखतवाडा ही दोन गावे पुन्हा सुटल्या जातील. यामुळे महामंडळाने याकडे दुर्लक्ष केले होते. मात्र धामंत्री येथील नागरिक तसेच विद्यार्थ्यांनी हा प्रश्न उचलून धरला होता. त्यानुसार १२ तारखेला आंदोलनाचा इशाराही दिला होता. त्यानुसार तिवसा येथून १२.३० वाजता निघालेली एमएच ५७०३ ही बस चिंधाई फाटा येथे येताच नागरिकांनी रस्ता रोको करून बस अडवली. त्यानंतर शिवसेना तालुकाप्रमुख विलास माहोरे सरपंच राजेंद्र मढवे यांनी तिवसा येथील वाहतूक नियंत्रक प्रतीक मोहोड यांच्याशी समन्वय साधून तोडगा काढण्यात आला.

## आर्थिक मदतीसाठी संत्रा उत्पादकांचे साकडे:तलसीलदारांना निवेदन

### हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ धा.रेल्वे-** कुऱ्हा संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळण्याबाबत अंजनवती येथील संत्रा उत्पादकांनी तहसीलदार व कृषी अधिकारी यांना साकडे घातले. दोन्ही अधिकाऱ्यांना निवेदन देत संकटात असलेल्या संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने प्रती हेक्टर एक लाख रुपये



आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली.

धामणगाव रेल्वे तालुक्यात महिनाभरापासून रिमझिम तर कधी मोठ्या प्रमाणात पाऊस सुरू आहे. सततच्या पावसामुळे संत्रा पिकांवर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर फळगळ होत असून संत्रा बागेत फळांचा सडाच पडल्याचे दिसून येत आहे. या संकटामुळे संत्रा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. धामणगाव रेल्वे तालुक्यातील अंजनवती व परिसरात मोठ्या प्रमाणावर संत्रा फळबागा आहेत. मोठ्या संख्येने संत्रा उत्पादक शेतकरी उत्पादन घेतात. मात्र यंदा सलग महिनाभरापेक्षा जास्त पाऊस झाल्याने संत्रा झाडावर अज्ञात रोगाचा प्रादुर्भाव झाला. परिणामी संत्रा बागेत फळगळ झाली, यासंदर्भात तहसीलदार व कृषी अधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या वेळी संत्रा उत्पादक शेतकरी विठ्ठल सपाटे, श्रीधर भोयर, जीवन घावट, शेखर भोयर, पंकज वानखडे, मुकेश राठी, गजानन उंद्रे, गजानन गाडवे आदी शेतकरी उपस्थित होते.

## उर्दू प्राथमिक शाळेमधील पटसंख्या व इमारत पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी केले समाधान व्यक्त

## उपजिल्हा रुग्णालयामधील समस्या घेतल्या जाणून चांदूर बाजारात जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या विविध ठिकाणी भेटी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३चांदूर बाजार-** चांदूर बाजार येथील अल्लामा इकबाल नगर परिषद उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक १ ला भेट दिली असता तेथील सुंदर इमारत, स्वच्छता व पटसंख्या पाहून जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी समाधान व्यक्त केले. चांदूरबाजार तालुक्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी धावती भेट दिली असता नगरपरिषद उर्दू प्राथमिक शाळेला भेट दिली.यावेळी मुख्याध्यापक शेख अब्दुल फारूक यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत केले. जिल्हाधिकाऱ्यांनी वर्ग चौथ्या मधील विद्यार्थ्यांसोबत हितगुज केली. शाळेची प्रगती बाबत माहिती जाणून घेतली.शाळेच्या उधानात वृक्षरोपण केले. त्यानंतर उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन पाहणी करून, समस्या जाणून घेतल्या. या ठिकाणी स्त्री रोग तज्ञ, वरिष्ठ डॉक्टर, सीसीटीव्ही कॅमेरे, आधुनिक यंत्र, तसेच एक पोलीस कर्मचारी आदींचा अभाव असल्याच्या समस्या उपस्थितनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर मांडल्या. यावर तोडगा काढून देण्याचे आश्वासन यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. त्यानंतर जमापुर येथील शेतकरी लक्ष्मणराव वासनकर यांच्या शेतात नुकसानग्रस्ताचे पहाणी केली. त्यानंतर तहसील कार्यालयामध्ये आढावा बैठक घेण्यात आली. या आढावा बैठकीमध्ये संजय गांधी निराधार योजने मधील लाभार्थीची जास्त संख्या पाहून, राज्य शासनामार्फत चालू असलेल्या लाभार्थी तपासणी काटेकोरपणे करा अशा सूचना दिल्या. नैसर्गिक आपत्ती अनुदान वाटपाबद्दल समाधान व्यक्त केले. तसेच यावेळी वयोश्री वृद्धकाळ योजना, लाडकी बहीण योजना या संदर्भातही माहिती घेतली. त्यानंतर प्रशासकीय इमारतीची पाहणी करून मोर्शीला रवाना झाले.



यावेळी उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, तहसीलदार रामदास शेळके, नायब तहसीलदार प्रथमेश मोहोड, विनोद भगत यावेळी उपस्थित होते.

# सर्वोच्च न्यायालयाच्या आरक्षण निर्णयाबाबत दर्यापुरात चिंतन

## जिल्ह्यातील पहिला कार्यक्रम, जात-जमातीच्या उपवर्गीकरणाचा मुद्दा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३दर्यापूर** – अनुसूचित जाती-जमाती आरक्षणाचे जातीनिहाय उपवर्गीकरण आणि क्रिमिलेअरबाबत सर्वोच्च न्यायालयाने अन्यायकारक निर्णय दिला, असे स्थानिक विधिज्ञांचे म्हणणे आहे. त्या अनुषंगाने येथे चिंतन शिबिर घेण्यात आले. दर्यापूर- अकोट रोडवरील महालक्ष्मी सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या चिंतन शिबिरात प्रामुख्याने विदर्भाच्या अमरावती, अकोला, वाशीम व बुलडाणा जिल्ह्यातील पुरोगामी चळवळीतील बुद्धिजीवी कार्यकर्ते सहभागी झाले होते.

या शिबिरात भविष्यात येणाऱ्या समस्यावर सखोल चर्चा आणि विचार विनिमय करण्यात आला. येथील ज्येष्ठ विधिज्ञ व भारतीय संविधानाचे गाढे अभ्यासक ड. संतोष कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित या शिबिरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर टीचर असोसिएशन (डाटा)चे विभागीय सचिव प्रा. डॉ. एम. आर. इंगळे, सम्राट अशोक प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. विजय आठवले, प्रा. डॉ. बाळकृष्ण खंडारे, प्रा.संदीप भोवते, ॲड. संजय आठवले, ॲड. देवानंद पर्वतकर, प्रा. सुनील कांबळे आदी विचारवंतांनी मार्गदर्शन केले.सुप्रीम कोर्टाने अनुसूचित जाती जमातीच्या प्रवर्गाची जात निहाय उपवर्गीकरण करण्याचा निकाल नुकताच घोषित केला. तसेच अनुसूचित जाती जमातींना क्रिमिलेअर अशी शिफारस सुद्धा केली आहे. या निर्णयामुळे देशातील अनुसूचित जाती-जमाती समूह चिंताग्रस्त झाले असून या निकालाचा संदर्भ घेत भविष्यात अनुसूचित जाती-जमातीसाठी मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. ही भीती दूर करण्यासाठी व आरक्षणाचे रक्षण करण्यासाठी संसदेत कायदा करण्याची गरज असल्याचे मत विचारवंतांनी व्यक्त केले. आरक्षणाचा आधार प्रामुख्याने सामाजिक मागासलेपण हाच असल्याने अनुसूचित जाती जमातीसाठी क्रीमिलेअरची शिफारस करणे अन्यायकारक असून मागासवर्गीयांचे आरक्षण संपवण्याचा हा डाव असल्याची शंका मागासवर्गीयांत निर्माण झालेली आहे. दरम्यान पुढील भूमिका कशी असावी याबाबत सम्राट अशोक प्रतिष्ठानचे पदाधिकारी प्रा. शैलेश इंगळे, अनिल गवई, विद्याधर मोहोड, संदेश गवई, मंदा शिरसाट, निरंजन वाकोडे, बी. जे. इंगळे आदींनीसुद्धा आपले विचार व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रभाकर चौरपगार, तर आभार सुधीर बसवंत यांनी मानले. शिबिरासाठी अशोक दुधंडे, विजय दुधंडे, सुधीर तायडे, नागेश रायबोले यांनी परिश्रम घेतले.राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना कार्यक्रमादरम्यान आरक्षण बचाव कृती समितीची महाराष्ट्राची समन्वयक समिती ॲड. संतोष कोल्हे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आली. त्यामध्ये अमरावती, अकोला, वाशीम, यवतमाळ, बुलडाणा, जालना, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, गोंदिया आदी जिल्हयातील पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे. या समितीची सभा लवकरच मुंबई येथे घेतली जाणार आहे.




## उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते १५ सप्टेंबर रोजी संविधान मंदिराचे लोकार्पण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३अमरावती,** कौशल्य , रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग व व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबईच्या एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे रविवार, दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी १०.३० वाजता आयोजित कार्यक्रमात संविधान मंदिराचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्या हस्ते दूरदृश्यप्रणालीद्वारे लोकार्पण होणार आहे.

जागतिक लोकशाही दिनाच्या निमित्ताने या कार्यक्रमाचे आयोजन होत असून राज्यातील ४३४ आयटीआयमध्ये १५ सप्टेंबरला, सकाळी १०.३० वाजता संविधान दिन लोकार्पण सोहळा साजरा करण्यात येणार आहे.यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा यांची या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे सचिव गणेश पाटील, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे संचालक सतिश सुर्यवंशी, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे आयुक्त प्रदीप डांगे यांच्यासह विभागाचे अन्य वरीष्ठ अधिकारी या महत्वपूर्ण कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहे. या कार्यक्रमाला नागरिकांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उदयोजकता व नाविन्यता विभागाव्दारे करण्यात आले आहे. हा कार्यक्रम राज्यातील सर्व नागरिकांना समाजमाध्यमांवर लाईव्ह पाहता येईल, असेही विभागाव्दारे कळविण्यात आले आहे.

## अमरावतीला येणारा लाखो रुपयांचा गुटका धारणी पोलिसांनी पकडला



### दोन आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३धारणी** राज्यात प्रतिबंधित असलेल्या सुगंधित तंबाखू, गुटख्याची मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात येणारी मोठी खेप धारणी पोलिसांनी गुरुवारी पकडली. ट्रकमधून सुमारे २५ लाखांचा गुटखा जप्त करण्यात आला. एकूण ३५ लाखांचा हा मुद्देमाल आहे. अमरावती- बडनेरा येथील गुटखा तस्करांसाठी हा माल आणला जात असल्याचे ताब्यात घेतलेल्या दोघांनी पोलिसांना सांगितले. पोलिस सूत्रांनुसार, मध्य प्रदेशातील इंदूरहून अमरावती येथे प्रतिबंधित सुगंधित तंबाखू, गुटख्याची मोठी खेप येत असल्याची माहिती धारणी पोलिसांना मिळाली होती. खानुसार ढाकणा फाट्यावर सापळा रचून एमपी ०९ जीएफ ९४८३ क्रमांकाचा ट्रक थांबवून पोलिसांनी तपासणी केली. वायरच्या गुंडाळ्यांमागे पोत्यांमध्ये दडविलेला २५ लाखांचा माल आढळून आला. पोलिसांनी मुद्देमालसह ट्रक जप्तकेला. चालक जयश मिश्रा आणि वाहक रामलाल मेहरा यांनादेखील अटक करण्यात आली आहे.

पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या मार्गदर्शनाखाली धारणीचे पोलिस निरीक्षक अशोक जाधव, उपनिरीक्षक सतीश झाल्टे, ईश्वर सोळंके, पोलिस अंमलदार शेख गणी, राम सोळंके, कृष्णा जामूनकर, संजय मिश्रासह इतर पोलिस अधिकारी कर्मचाऱ्यांकडून कारवाई करण्यात आली. पुढील तपास ठाणेदारांच्या मार्गदर्शनात होत आहे. या प्रकरणाचे तार अमरावती शहरातील गुटखा तस्करांशी जुळून आले आहेत.

#### गुटखा येणार होता अमरावतीला

ट्रकमधील सुमारे २५ लाखांचा सुगंधित तंबाखू, गुटखा विक्रम उर्फ विक्की सच्चानंद मंगलानी (रा. ईमलीवाला प्लॉट, अमरावती), सें. जुनेद सै. जब्बार (रा. अमरावती) आणि शे. अमीन शे. नाजीम (रा. जुनी बस्ती, बडनेरा) यांच्याकरिता नेला जात असल्याची कबुली आरोपींनी पोलिसांना दिली.

गोपनीय माहितीवरून नाकाबंदी करून ट्रकची झडती घेतली. त्यामध्ये प्रतिबंधित गुटखा आढळला. ट्रकसह ३५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

– **अशोक जाधव,** पोलिस निरीक्षक, धारणी

## स्वच्छतेसाठी मनसेचे पालिका प्रशासनाला साकडे

## नगर पालिकेची पोलखोल करण्याचा दिला इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३ दर्यापूर-** सध्या सर्वत्र गणेशोत्सव सुरू असून यानंतर लगेचच नवरात्र व सणासुदीचे दिवस येत आहेत. त्यामुळे शहरातील अंतर्गत रस्त्यांवर पडलेले खड्डे बुजवावेत तसेच शहरात असलेली अस्वच्छता दूर करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने केली आहे. त्यासाठी नगरपालिका मुख्याधिकारी नंदू परळकर यांना निवेदन देण्यात आले आहे. सफाई कामगार सफाई करून घेतात व त्याचा ढिग रस्त्यावर तसाच लावून ठेवतात सदर ढिग उचलण्याचे काम कंत्राटदाराला दिले असून सदर कंत्राटदार कचरा उचलण्यास मोठा विलंब लावतो. त्यामुळे सदर कचरा अस्तव्यस्त होऊन पुन्हा अस्वच्छता निर्माण होते. शिवाय



नाल्या साफ करताना सदर नालीतील घाण बाहेर काढून तेथेच ठेवल्या जाते. त्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण होऊन रोगराई पसरत आहे. रोगराईपासून बचावाकरिता डास प्रतिबंधक फवारणी शहरांमध्ये नियमित करावी, असेही मनसेच्या मागणीपत्रात म्हंटले आहे.

दर्यापुरात बऱ्याच ठिकाणी बंद गाड्या, बांधकामाचे साहित्य नागरिकांच्या घरासमोर वर्षांनुवर्षे पडलेले आहे. प्रमुख रहदारीच्या मार्गावर फेरीवाले रस्त्याच्या मधोमध राजरोसपणे व्यवसाय करीत आहेत. त्यामुळे वाहतुकीला सुद्धा अडथळा निर्माण होत आहे. परिणामी छोठे-मोठे अपघात सुध्दा होत आहे. या सर्व प्रमुख बाबी मुख्याधिकारी नंदू परळकर यांच्या लक्षात आणून देत व त्वरित उपाययोजना करावी, यासाठी त्यांना साकडे घालण्यात आले. निवेदन देतेवेळी मनसेचे तालुकाध्यक्ष मनोज तायडे, उपतालुकाध्यक्ष पंकज कदम, विद्यार्थी सेना तालुकाध्यक्ष प्रथमेश राऊत, राज वानखडे, अनिकेत सुपेकर,संदीप झळके,राम शिंदे,भूषण टेकाडे,कमलेश शर्मा,आंबुलकर,ओम राणे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दर्यापूरचे मनसे तालुकाध्यक्ष मनोज तायडे म्हणाले, प्रशासक काळात नगरपालीका क्षेत्रात अनेक मुलभूत समस्यांपासून नागरिक त्रस्त झाले आहे. दरदिवशी सर्वसामान्य नागरिक कोणती ना कोणती समस्या किंवा तक्रार घेऊन पालीकेचे उंबरठे झीजवीत आहेत. काही विभागप्रमुख नागरिकांशी असभ्यपणे वागतात हे वास्तव आहे. त्यामुळे लवकरच सर्व प्रभागातील विविध सार्वजनिक समस्यांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आम्ही पोलखोल केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही.

## करजगावात चिंचोक्याची गणेशाची मूर्तीची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१३करजगाव** – ८५ वर्षांचा इतिहास लाभलेल्या लोखंडीपुरा स्थित गजानन महाराज संस्थानमधील चिंचोक्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण गणपतीला गणेशोत्सवादरम्यान गणेश मंडपात विराजमान करण्यात आले आहे. त्याच्या दर्शनाला गर्दी होत आहे.

यंदा चिंचोक्याच्या गणपतीपुढे स्थापना करण्यात आलेली गणेशमूर्ती ही प्रभू श्रीराम यांच्या रुपाचे दर्शन घडविणारी आहे. अयोध्येतील



श्रीराम मंदिरात प्राणप्रतिष्ठा करण्यात आलेल्या मूर्तीची प्रतिकृती असणारी गणेशमूर्ती स्थापन करण्यात आली. निसर्गपूरक असलेली ही मूर्ती हस्तकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. वर्षभर बाप्पांची मूर्ती ही स्थानिक मंदिरात विराजमान आली असली तरी दहा दिवस त्यासह तिन्ही मूर्ती मंडपात स्थापना केल्या जातात. तसेच विसर्जन मिरवणुकीत रथातही त्यांना स्थान असते.पारंपरिक विसर्जन मिरवणूक यात्रेत तृतीयपंथीयांचा सहभाग असतो. स्थापनेपासूनची ही परंपरा आजही कायम आहे. मध्यंतरी काही काळ शासनाच्या आदेशाने ती बंद ठेवण्यात आली होती. गेल्या काही वर्षांआधी रात्रभर मिरवणूक, त्यात तृतीयपंथी यांचे नृत्य, ढोलकी-बासरीसारखे पारंपरिक वाद्य, ढोल-ताशे हे विशेष आकर्षण होते. यावेळी बाप्पच्या दर्शनासाठी भाविकांची रांग लागत आहे.

#### गुरु-शिष्याची किमया

संस्थानात चिंचोक्यांपासून महाबली हनुमान व गरुडाची मूतीही तयार करण्यात आली होती. गुरु-शिष्यांची ही कलाकृती मनमोहक आहे. त्यामागील इतिहास असा की, करजगाव येथील रायजीबाई खेरडे या धाकट्या बहिणीकडे शिरजगाव कसबा येथे पाहुण्या गेल्या. तेथील सटवाईपुयातील मनमोहक गणेशमूर्ती पाहून त्या भारावून गेल्या. त्यांच्या विनंतीवरून मूर्तिकार गंगाराम वांगे व त्यांचे करजगाव येथील शिष्य बळीराम कविटकर यांनी विनामोबदला या मूर्ती तयार करून १५ सप्टेंबर १९३९ रोजी संस्थानला दान दिल्या. यासाठी चिंचोके, कागदाचा लगदा, सिरस, ताग व माती वापरण्यात आली.

## विदर्भात भाजपला मोठा फटका बसणार; अंतर्गत सर्व्हेने वाढवली डोकेदुखी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि१३मुंबई-** विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांनी स्थानिक पातळीवर आढावा घेण्यासाठी स्वतःचे सर्व्हे सुरू केले आहेत. महायुतीकडून राज्यभरात असे अंतर्गत सर्व्हे सुरू आहेत. अशातच महायुतीने विदर्भात केलेल्या अंतर्गत सर्वेची माहिती समोर आली आहे. भाजपच्या अंतर्गत सर्व्हेत विदर्भात महायुतीला फक्त २५ जागा मिळत असल्याची असल्याचे या सर्वेक्षणातून स्पष्ट होत आहे. त्यामुळे हा सर्वे भाजपची डोकेदुखी वाढवणारा आहे.

राज्यात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. राजकीय घडामोडींना वेग आला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीतील राजकीय पक्षांनी दौरे, बैठका, संवाद बैठका सुरू आहेत. पण महायुतीने विदर्भात केलेल्या सर्वेमुळे भाजपची




चांगलीच झोप उडाली आहे.महायुतीने केलेल्या सर्वेक्षणात महायुतीला विदर्भात मोठा फटका बसणार आहे. विदर्भात भाजपला १८ जागा, शिंदे गटाला ५ जागा व अजित




पवार गटाला फक्त २ जागा मिळणार असल्याचे या सर्वेक्षणातून दिसत आहे. धक्कादायक म्हणजे नागपूर जिल्ह्यात भाजपाला फक्त ४ जागा मिळत असल्याचे सर्वेक्षणातून समोर आले आहे.

एकीकडे विदर्भात महायुतीचे नुकसान होत असतानाच दुसरीकडे महायुतीतल जागावाटपाचा तिढाही अद्याप कायम आहेत. यावरूनही महायुतीतल मोठा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. एका माहितीनुसार, जवळपास चाळीस मतदारसंघात महायुतीत जागावाटपाचा तिढा वाढण्याची शक्यता आहे. या मतदारसंघांसाठी तीनही पक्षांमध्ये मोठी चढाओढ सुरू आहे. यासोबतच गेल्या आठवड्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हेदेखील मुंबई दौऱ्यावर होते. त्यावेळी त्यांनी झालेल्या बैठकीतही वाद निर्माण होणाऱ्या मतदारसंघांचा तिढा लवकरात लवकर सोडवण्याच्या सुचनाही अमित शाहांनी दिल्या आहेत. त्यामुळे या आठवड्यात या मतदारसंघांवर तोडगा निघण्याची शक्यता आहेत.

# लाडक्या बहिणींचे अनुदान लाटण्यासाठी १२ पुरुषांनी महिलांचे फोटो लावून भरला अर्ज

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील धक्कादायक प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ छत्रपती संभाजीनगर**

महायुती सराकरने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना घोषित केल्यापासून आतापर्यंत कोट्यवधी महिलांनी या योजनेसाठी अर्ज भरला आहे. महिलांचा उस्फुर्त प्रतिसाद पाहता आणि अर्ज भरण्यास अडचणी येत असल्यामुळे राज्य सरकारने या योजनेला सप्टेंबरपर्यंतची मुदतवाढ दिली आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी राज्य सरकारने जुलै महिन्यात अर्ज केलेल्या ८० लाख महिलांच्या खात्यात पैसे पाठविले आहेत. महिलांच्या खात्यात पैसे येत असल्याचे पाहून आता काही पुरूषांनीही महिलांचा फोटो वापरून स्वत:च्या बँक खात्याची माहिती देत अर्ज भरल्याचे समोर आले आहे.




छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड तालुक्यात हा प्रकार घडल्याचे निदर्शनास आले असून याची चौकशी सुरू आहे.

**नेमका प्रकार काय?**

लाडकी बहीण योजनेत २१ ते ४५ वयोगटातील दुर्बल घटातून येणाऱ्या महिलांना प्रति महिना दीड हजार रुपयांची मदत दिली जात आहे. या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज भरले जात आहेत. या संधीचा फायदा घेऊन कन्नड तालुक्यातील १२ पुरुषांनी महिलांचे फोटो वापरून अर्ज भरले आहेत. सोशल मीडियावर आजवर पुरुष महिलांच्या नावाने अकाऊंट उघडून फसवणूक करत असल्याचे अनेक प्रकार घडले आहेत. मात्र महिलांचे फोटो वापरून थेट सरकारलाच गंडविण्याचा हा धक्कादायक प्रकार कन्नड तालुक्यात घडला आहे.आता या सर्व लाडक्या भावांवर कारवाईची टांगती तलवार आहे.

# तुपातील भेसळ तुमचे आरोग्य बिघडवणार

## सणवारांमुळे वाढली तुपाला मागणी : मात्र भेसळयुक्त तुपापासून राहा दूर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

सध्या सणासुदीचे दिवस असल्यामुळे तुपाची मागणी वाढली आहे. परंतु, तुपातील भेसळ हे तुमच्या आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. त्यामुळे तूप घेताना ते भेसळयुक्त तर नाही ना? याची खात्री करणे आवश्यक आहे. अनेक जण बाहेरून तुपाची खरेदी करतात.



भेसळ युक्त तूप खाल्यामुळे अपचनाचा त्रास होऊ शकतो.कारण त्यात पचनास हानिकारक घटक असतात.वातावरणात बदल होण्याच्या काळात भेसळयुक्त तूप खाल्यामुळे कफ किंवा खोकला, सर्दीचा त्रास होतो.भेसळयुक्त तुपाच्या सेवनामुळे घशात खवखव होऊ शकते. त्यामुळे आवाज बसतो त्यामुळे खात्रीलायक डेअरी मधूनच तूप खरेदी करा.

**भेसळयुक्त तूप विक्री केल्यास होईल कारवाई**

भेसळयुक्त तूप विक्री केल्यानंतर त्याच्यावर अन्न व औषध प्रशास- नाकडून कारवाई केली जाऊ शकते. त्यामुळे तूप विक्रेत्यांकडून तूप घेताना ते भेसळयुद्ध आहे का? याची माहिती घेणे आवश्यक आहे.

# 'लाडकी बहिण'ला पुन्हा मुदतवाढ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

` मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेला चांगला प्रतिसाद मिळत आहे. यामुळे मुख्यमंत्र्यांनी या योजनेला आता ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे या योजनेत अर्ज दाखल करणाऱ्या महिला उमेदवारांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेकरिता अर्ज दाखल करण्यासाठी ३१ ऑगस्ट ही अंतिम तारीख देण्यात आली होती. या योजनेत दररोज अर्ज भरणाऱ्या महिलांची संख्या वाढत आहे. यामुळे योजनेसाठी राज्य शासनाने ३१ सप्टेंबरपर्यंत मुदत दिली आहे. यामुळे ज्या महिला लाभार्थींना अजूनपर्यंत अर्ज दाखल करता आले नव्हते, अशा महिला लाभार्थींना अर्ज दाखल करता येणार




आहे.तिसऱ्या टप्पात अर्ज दाखल करणाऱ्यामहिलांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. हा आकडा सात लाख लाभार्थींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे. या योजनेत पूर्वी जुने पोर्टल वापरले जात होते. आता या योजनेसाठी नवीन पोर्टल लाँच झाले आहे. त्यामुळे अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सोपी झाली आहे. यासोबतच अंगणवाडीताईकडे अर्ज दाखल करून घेण्याच्या सूचना महिला बालकल्याण विभागाला देण्यात आल्या आहेत. यामुळे महिलांचा होणारा त्रास कमी होण्यास मदत होणार आहे.

**उत्सवातही महिलांचे लोंढे शहराकडे**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेत लभार्थींचे लोंढे दररोज शहराकडे वळत आहेत. सण-उत्सवांत शासकीय कार्यालयांत गर्दी कमी असते. यामुळे कामकाज लवकर होईल म्हणून शासकीय कार्यालयांत कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी महिलांनी सण-उत्सवांत गर्दी वाढवली आहे. याचा परिणाम प्रवासी वाहतुकीवरही झाला आहे.

# शेतकऱ्यांनो योजनेचे पैसे अटकले; लवकर करा मोबाइल नंबर अपडेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या अनेक शेतकऱ्यांचा डाटा अपलोड करताना शेतकऱ्यांनी नोंदणीच्या वेळी दिलेले मोबाइल क्रमांक चुकीचे असल्याचे आढळून आले आहेत. मोबाइल क्रमांक दुरुस्तीची संधी राज्य शासनाने दिली होती. ३१ ऑगस्टपर्यंत ही मुदत होती. आता यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्यामुळे योजनेचे पैसे लटकण्यापूर्वी शेतकऱ्यांनी आपला मोबाइल क्रमांक बदलून घेणे फायद्याचे ठरणार आहे. कर्जमुक्तीसाठी आधार प्रमाणीकरण करणेही गरजेचे आहे.

पीएम किसान योजनेसाठी पोर्टलवर माहिती अपलोड करताना अनेकांनी चुकीच्या भ्रमणध्वनी क्रमांकाची नोंदणी



केली आहे. ते दुरुस्त करून घेण्यासाठी राज्य शासनाने मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी मुदतीत भ्रमणध्वनी क्रमांक दुरुस्त करून घेणे आवश्यक आहे. तेव्हाच यापुढील पीएम किसान सन्मान निधीचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकतो. महात्मा जोतिबा फुले शेतकरी कर्जमुक्त योजना २०१९ अंतर्गतप्रोत्साहनपर लाभ योजनेसाठी आधार प्रमाणीकरणासाठी १८ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

**असा करावा मोबाइल क्रमांक अपडेट**

शेतकऱ्यांनी pmkisan.gov.in या वेबसाईटवर क्लिक करावे. त्यात उजव्या बाजूला फार्मर कॉर्नरमध्ये अपडेट मोबाइल नंबरवर क्लिक करावे. अपडेट मोबाइल नंबर ही विडो ओपन झाल्यानंतर त्यामध्ये आपला रजिस्ट्रेशन नंबर किंवा आधार क्रमांक टाकल्यानंतर नंबर अपडेट होईल.

**दुरुस्तीबाबत जागृती करण्याची गरज**

असा करावा मोबाइल क्रमांक अपडेटकृषी विभागामार्फत शेतकऱ्यांमध्ये मोबाइल क्रमांक दुरुस्तीसाठी जागृती केली जात आहे; परंतु, याबाबत बहुतांश शेतकऱ्यांना माहिती नसल्याने त्या शेतकऱ्यांचे मोबाइल क्रमांक बदलायचे बाकी आहेत.

# बंद पेटीतून झोला, झोलीनचे मुखवटे बाहेर निघाल्याच्या चर्चेने नागरिकांची चिकार गर्दी

## टाकरखेडा शंभू येथील प्रकार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ टाकरखेडा संभू**

एका बंद पेटीत महालक्ष्मीच्या मुखवट्यासह झोला झोलीनचे मुखवटे बंद पेटीत असताना यातील झोलाझोलींनचे पुतळे अचानक गणपती समोर येऊन नैवेद्य श्रवण करीत असल्याची चर्चा सर्वत्र पसरली अन शेकडो गावकरी हा प्रकार पाहण्याकरिता टाकरखेडा संभु येतील जुना प्लॉट येथे रहिवासी असलेले राजेश अहेरि यांच्या घरी धडकले, त्यामुळे बुधवारी



रात्री उशिरापर्यंत येथे गर्दी पहावयास मिळाली ,

राजेश अहिर यांच्याकडे २० वर्षांपासून महालक्ष्मी बसतात परंतु यंदा घरगुती अडचणीमुळे महालक्ष्मी पूजनाचा कार्यक्रम ऐनवेळी रद्द करण्यात आला होता, त्यामुळे राजेश अहिर यांच्या म्हणण्याप्रमाणे दोघे पती-पत्नी यांनी गणपती समक्ष गणपतीचे नैवेद्य ठेवून दोन महालक्ष्मीचे देखील नैवेद्य ठेवले व आरती पठन करून ते गावामध्ये इतरांच्या घरी लक्ष्मीपूजनाचा प्रसाद घेण्याकरता गेले होते मात्र सायंकाळी ते घरी परत आले असता त्यांना गणपती समोर झोलाझोलींनचे मुखवटे व त्यांच्या तोंडामध्ये शेवळ्यांचे नैवेद्य असलेले आढळून आले त्यामुळे त्यांनी परिसरात याची माहिती सांगितली या चर्चेने संपूर्ण गावकरी त्यांच्या घरी लोटले त्यामुळे सायंकाळी उशिरापर्यंत त्यांच्या घरी नागरिकांची गर्दी हा प्रकार पाहण्याकरता जमली होती तसेच अनेक तर्कवितर्क देखील लावल्या जात होते.

# हिंगणघाटच्या वैद्यकीय महाविद्यालयाची जागा अखेर ठरली

## जाम येथील कृषी खात्याच्या ४० एकर जागेवर समितीने केले शिक्कामोर्तब

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ वर्धा :**

जिल्ह्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हिंगणघाट येथे मंजूर झाले. मात्र जागेचा मोठा तिढा उद्भवला होता. त्यावर वैद्यकीय शिक्षण मंत्रालयाने गुरुवारी सायंकाळी आदेश काढून निर्णय दिला. त्यानुसार १०० प्रवेश क्षमतेचे व ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय समुद्रपूर तालुक्यातील जाम येथील कृषी खात्याच्या जागेवर स्थापन होणार. जागेचा मोठा वाद झाल्यावर तज्ञ् समिती स्थापन करण्यात आली हाती. समितीने हिंगणघाट तालुक्यातील काही जागा तसेच समुद्रपूर तालुक्यातील जाम येथील शासकीय जागा तपासल्या. नंतर अहवाल दिला. त्यानुसार जाम येथील कृषी खात्याच्या ४० एकर जागेवर समितीने शिक्कामोर्तब केले.

**जागेचा वाद उफाळणार**

हे महाविद्यालय हिंगणघाट येथे मंजूर झाले होते. पण आरोग्य व्यवस्थापन डोळ्यापुढे ठेवून निर्णय होणार होता. आता आदेशात हिंगणघाट ऐवजी समुद्रपूर तालुक्यात जाम येथे मंजूर करण्यात आल्याचे नमूद आहे. भाजपसोडून सर्व राजकीय पक्ष तसेच संघर्ष समितीने शासकीय जागेवर महाविद्यालय व्हावे म्हणून मुद्दा रेटला. पुढे समुद्रपूर येथील जागापाहणी झाल्यावर राजकीय बाब पुढे आली. आमदारकीचा सवाल म्हणून समुद्रपूरचा हट्ट काहींनी सोडून दिला. आता केवळ संघर्ष समिती हिंगणघाट साठी आग्रही आहे.

न्यायालयात जाण्याची भाषा सूरू झाली आहे. तसेच आज शुक्रवारी पुढील आंदोलन ठरविण्यासाठी हिंगणघाट येथे सभा आयोजित करण्यात आली आहे. तर जाम येथे स्थापन होत असल्यास वाईट काय, असे समुद्रपूर समर्थक विचारत असून आतापर्यंत ५० किलोमीटर दूर जात होतोच. आता ५ किलोमीटरवर वैद्यकीय सेवा उपलब्ध होत असल्याने त्याचे स्वागत करावे, असे म्हणतात.

## तरुणांनो व्यसना पासून दूर राहा तरच गणपती बसवा : ओम महाराज पाथरे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३नांदगाव खंडेश्वर**

तरुणांनो व्यसना पासून दूर राहा तरच गणेशोत्सव साजरा करा असे प्रतिपादन विदर्भातील प्रसिद्ध बाल कीर्तनकार ओम महाराज पाथरे यांनी केले राधे गणेशोत्सव मंडळा तर्फे आयोजित किर्तन सोहळ्यात केले लोकमान्य टिळकांनी ब्रिटिशांच्या विरोधात लढण्यासाठी जनतेत एकजुट निर्माण व्हावी म्हणून गणेशोत्सव सुरू केला मात्र आज काल गणेशोत्सव साजरा करतांना एकजूट तर नाही विद्रुपीकरण होत आहे आमचा तरुण व्यसनाधीन होऊन होऊन कुटुंबाचा सत्यानास करून ज्या वयात आई वडिलांना आराम देऊन त्यांची सेवा करायला पाहिजे त्या वृद्धाश्रमात पाठवतो आणि आम्ही काय तर गणेशोत्सव साजरा करतो म्हणून तरुणांनो व्यसने सगळी सोडून द्याना सरळ पणाचे जीवन जगा नाअसे म्हणत आपल्या माय बापाची सेवा करा असे आवाहन सुद्धा बाल कीर्तनकार ओम महाराज पाथरे यांनी आपल्या कीर्तनातून केले यावेळी सात सांगत म्हणून गायक प्रा रवींद्र इंगळे तबलावादक विशाल दिवे ओम भोजने ओम राऊत गोकुळ वानखडे यांनी सात संगत दिली नांदगाव शहरातील राधे गणेशोत्सव मंडळा तर्फे दहा दिवस विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले या वर्षी सुद्धा आयोजन केले आहे.

# महावितरणाच्या योजनांचा जिल्हाभर जागर... गणेशोत्सवादरम्यान सहभागी होण्यासाठी ग्राहकांना साकडे

## जनजागृतीसाठी पोस्टर्स,बॅनर्सचाही वापर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३अमरावती**

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना, तसेच महावितरण अभय योजना,आदी योजनांचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरीकांनी घ्यावा यासाठी गणेश उत्सवादरम्यान दर्शनसाठी आलेल्या भाविकांना बॅनर्स,पोस्टर्स,आणि गणेश मंडळांना प्रत्यक्ष भेटी देऊन गावा-गावातून योजनांची माहिती देत लाभ घेण्याचे महावितरणकडून आवाहन करण्यात येत आहे.

महावितरणच्या वतीने प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजना, महावितरण अभय योजना,पी.एम.कुसूम योजना,मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना राबविण्यात येत आहे.या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता गणेशोत्सवादरम्यान मुख्य



अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनात,परिमंडळात विविध उपाय- योजना करण्यात येत आहेत. यात जिल्ह्यातील मोठी गावे,बाजारापेठा,गर्दीच्या ठिकाणी बॅनर्स,पोस्टर्स आणि पॅम्प्लेट तसेच मोठ्या गणेश मंडळांना भेटी देऊन थेट भक्तांसी संवाद साधत योजनेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

याचाच भाग म्हणून अमरावती शहरातील श्री. बजरंग गणेशोत्सव मंडळ, पटवीपुरा, अंबागेट येथे आयोजित कार्यक्रमात स्वत: अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी भेट दिली विविध योजनांची माहिती दिली,तसेच महावितरण पर्यावरणपूरक स्वच्छ ऊर्जेसाठी आग्रही असुन सहभागी होणाऱ्या ग्राहकांना सर्व तांत्रिक सहकार्य करण्यास तयार असल्याचे सांगीतले. याचबरोबर नुकताच १ सप्टेंबरला सुरू झालेल्या आणि केवळ तीन महिन्या पर्यंत सुरू राहणाऱ्या महावितरणच्या अभय योजनेत सहभागी होऊन थकबाकीमुक्त होण्याचे आवाहन यावेळी त्यांनी केले. याप्रसंगी कार्यकारी अभियंता संजय सराटे,व्यवस्थापक विकास बांबल,अतीरिक्त कार्यकारी अभियंता सुधीर वानखडेसह अधिकारी अभियंते उपस्थित होते.

यावेळी सामाजिक कार्यात अग्रेसर असलेले जेष्ठ नागरिक श्री बाबुलाल मामर्डे यांनी विविध चार ठिकाणी सोलर जोडणी दान केल्याबद्दल त्यांचा अधीक्षक अभियंता यांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

# ‘मुख्यमंत्री माझी शाळा’ अभियानाचे बदलले निकष

## मागीलवर्षी निवड झालेल्या तसेच निम्न क्रमांकाच्या शाळा ठरणार अपात्र

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**




मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ अभियानातील दुसरा टप्प्यातील बदललेल्या निकषानुसार १५० गुण केले. याशिवाय मागील वर्षी शाळांचा पुरस्कार प्राप्त झालेला क्रमांक किंवा त्यापेक्षा निम्न क्रमांकासाठी यावेळी विचार केला जाणार नाही. त्यामुळे नवीन शाळांना पुरस्काराची संधी मिळणार आहे. असे असले तरी दुसऱ्या टप्प्यात बदल केल्याने अशा शाळांना वरच्या स्तरावरील क्रमांक मिळण्याची धडपड करावी लागणार आहे.

शाळांचा भौतिक, शैक्षणिक विकासाबरोबरच पालक सहभाग वाढविण्यासाठी शासनाने ’मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा’ या अभियानाअंतर्गत शाळांना प्रोत्साहित करीत आहे. दुसऱ्या टप्प्यातील शाळांचे तालुकास्तरीय मूल्यांकन प्रक्रिया पूर्ण झाली आहे. केंद्रीस्तरीय ऑनलाइन मूल्यांकनासाठी सोडत पद्धतीने केंद्रप्रमुखांची नियुक्ती करण्यात आली. केंद्रस्तरीय तसेच तालुकास्तरीय मूल्यमापनाची प्रक्रिया पूर्ण झाली. मात्र, शिक्षण विभागाकडून दुसऱ्या टप्प्यातबदल केला आहे. यामध्ये मागील वर्षी शाळांचा पुरस्कार प्राप्त झालेला क्रमांक किंवा त्यापेक्षा निम्न क्रमांकासाठी यावेळी विचार केला जाणार नाही. असा बदल केल्याने अशा शाळांचा वरचा टप्पा गाठण्यासाठी सध्या चांगलीच कसरत करावी लागत आहे.मूल्यांकनात शाळास्तरावर स्काऊट गाइड, महावाचन चळवळ, अध्ययन निष्पत्ती, विविध समितीची अद्ययावतीकरण, शिक्षकांचा गुणात्मक विकास, क्षमतेनुसार वर्ग खोल्या, फर्निचर, आरोग्य सुविधा या बाबी पुरस्कारासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

**स्पर्धेत टिकण्यासाठी शिक्षकांची धडपड**

स्पर्धेत टिकण्यासाठी जिल्ह्यातील काही शिक्षकांनी धडपड सुरू केली आहे.

लोकसहभाग वाढवून या माध्यमातून शाळांचा विकास केला जात आहे. आपल्याच शाळेचा नंबर यावा यासाठी शिक्षकांची बरीच धडपड सुरू आहे.

# फुल उत्पादकांना महालक्ष्मी पावली : ही दरवाढ दिवाळीला मिळाली तर शेतकऱ्यांच्या उत्पन्नात भर पडेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

महालक्ष्मी आणि गणेश उत्सवामुळे फुलांचे दर वधारले आहेत. एरवी ५० रुपये किलो असणारे फुल उत्सव काळात ३०० ते १००० रुपये किलोच्या घरात पोहचले आहेत. याचा फायदा फूल उत्पादक शेतकऱ्यांना झाला आहे. मात्र फुलांची लागवडच कमी असल्याने पश्चिम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना याचा सर्वाधिक लाभ झाला आहे. हाच दर दिवाळी आणि दसरा उत्सवात राहिला तर याचा फायदा शेतकरी बांधवांना होणार आहे.



वन टाईम हातात येणारे पीक म्हणून झेंडूकडे पाहिले जाते. एकाचवेळी झेंडू तोडला जातो. मात्र इतर फुलांना दररोज तोडावे लागते. यातून इतर फूल लावण्याकडे दुर्लक्ष केले जाते. कृषी विभागाने शेतकऱ्यांना मार्केटिंगची व्यवस्था करून द्यावी.
**नरेंद्र सदावर्तेफुल उत्पादक शेतकरी.**


अमरावती जिल्ह्यात फुल शेतीचे प्रमाण नगण्य आहे. ओलिताची सुविधा असणारे शेतकरीच फुलाची लागवड करतात. याशिवाय ट्रान्सपोर्टचा प्रश्न आहे. यामुळे अनेक शेतकरी फुलाची लागवड करीत नाही. यातून फुल शेतीचे पाहिजे तसे क्षेत्र वाढले नाही. यावर्षी पावसाचे प्रमाण अधिक असल्याने फुल शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. झेंडूसह इतर फुलांची पावसामुळे मोठ्या प्रमाणात नासाडी झाली. यातून जिल्ह्यातील फुलाचे उत्पादन घटले.

जिल्ह्यात झेंडूच्या फुलांची लागवड शेतकऱ्यांनी केली आहे. गुलाब, शेवंती यासह विविध जातीच्या फुलाची लागवड केली तर त्याला ग्राहक मिळविण्यासाठी इतरत्र जावे लागते. ही ट्रान्सपोर्ट व्यवस्था नसल्याने शेतकऱ्यांनी अशा पध्दतीच्या फुलांची लागवड केलेली नाही.

# गणेशोत्सवाच्या गर्दीत रोडरोमिओंवर विशेष नजर महत्त्वाच्या ठिकाणी पोलिसांची नेमणूक बंदोबस्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३ अमरावती**

गणेश उत्सवाच्या कालावधीत उसळणाऱ्या गर्दीचा गैरफायदा रोमियोंनी उचलू नये. यासाठी पोलिस विभाग विशेष सतर्क झाला आहे.पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या मार्गदर्शनानुसार सायंकाळी ६ वाजेपासून शहरातील मुख्य चौकात व ज्या ठिकाणी नागरिकांची गर्दी उसळते अशा ठिकाणी पोलिस तैनात करण्यात आले आहेत.



जिल्हाभरात गणेश उत्सवाला सुरुवात झाली आहे. गणेश मंडपात विविध आकर्षित देखावे पाहण्यासाठी भक्तांची गर्दी होत आहे. तसेच आकर्षक विद्युत रोषणाई केली जात असल्याने नागरिक सदर देखावे पाहण्यासाठी गणेश मंडळाच्या ठिकाणी येतात. प्रामुख्याने रात्री ८ ते १० वाजेपर्यंत भाविक व नागरिकांची गर्दी असते. या गर्दीमध्ये कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस विभाग सतर्क आहे.शहरात महिला पोलिसांचे पथक,दामिनी पथक सायंकाळ पासून रात्री १२ पर्यंत गस्तीवर असतात.

# राहुल गांधी विरुद्ध भाजप आक्रमक, पुतळा ही जाळला



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती :**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या अमेरिकेतील आरक्षणासंदर्भातील विधानावर भाजपने आक्रमक पवित्रा घेतला असून शहरातील भाजपच्या नेत्यांनी राहुल गांधी यांच्या प्रतिमेला जोडे मारून आणि प्रतिमा जाळून निषेध व्यक्त केला.शहर आणि ग्रामीण भाजप असे दोन वेगवेगळे आंदोलने आज करण्यात आली

येथील इर्विन चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर राहुल गांधी यांच्या विरोधात आंदोलन करून घोषणाबाजी करण्यात आली. नंतर राहुल गांधी यांच्या प्रतिमेची जाळपोळ करण्यात आली. आरक्षणविरोधी भूमिका काँग्रेसने घेऊ नये, अन्यथा भाजप त्यांना फिरू देणार नाही, असा इशारा भाजप अनुसूचित जाती सेलचे सिद्धार्थ वानखडे यांनी दिला. यावेळी भाजपचे प्रवक्ते शिवराय कुळकर्णी उपस्थित होते.भारतात पक्षपातीपणा थांबेल तेव्हा आरक्षण संपवण्याचा विचार करु, असे राहुल गांधी म्हणाले होते. अमेरिकेत राहुल गांधींनी आरक्षणावरुन हे वक्तव्य केले, मात्र त्यांच्या या वक्तव्याचे देशात आता पडसाद उमटत आहेत. सत्ताधारी पक्षाने त्यांना यावरून कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. राहुल गांधी यांच्यावर टीका करीत आहेत. आरक्षण विरोधी काँग्रेसचा चेहरा समोर आला असे मुख्यमंत्री शिंदे म्हणाले. मतांसाठी आरक्षणावरुन कसा खोटा नॅरेटिव्ह केला हे राहुल गांधींच्या वक्तव्यातून दिसले असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. तर काँग्रेसची खरी आणि संविधान विरोधी भूमिका राहुल गांधींच्या तोंडून आता समोर आली आहे, अशी टीका भाजपच्या नेत्यांनी केली आहे. त्यांच्या वक्तव्याचा भाजपकडून राज्यभर निषेध केला जात आहे.तर खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या नेतृत्वात ग्रामीण चे भाजप कार्यकर्ते व पदाधिकारी एकत्र येत त्यांनी हि जोरदार आंदोलन केला यावेळी आ. प्रताप अडसड हे हि उपस्थित होते.

# १३२ माजी सैनिकांची ५ कोटी ४० लाखांची फसवणूक

## प्रहार संघटनेच्या नेतृत्वात पोलीस आयुक्तांकडे न्यायाची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१३अमरावती**




१३२ माजी माजी सैनिक व त्यांच्या नातेवाईकांची तब्बल ५ कोटी ४० लाखांनी फसवणूक झाल्याचं प्रकरण अमरावती समोर आलं आहे. सुधीर चक्रे नामक इसमाने या सर्व माजी सैनिकांची फसवणूक केल्याचा आरोप असून तो स्वतः देखील एक माजी सैनिक असल्याची माहिती आहे. फसवणूक झालेल्या सर्व माजी सैनिकांनी आज प्रहार संघटनेच्या नेतृत्वात पोलीस आयुक्तांची भेट घेऊन पैसे परत मिळवून देण्याची मागणी केली.सुधीर चक्रे नामक हा माजी सैनिक २०२० पासून या माजी सैनिकांच्या संपर्कात होता. सामूहिक व्यवसाय सुरू करण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असल्याचे सांगून सुधीरने या माजी सैनिकांकडून रक्कम गोळा केली. एक लाख रुपये पासून ते १९ लाख रुपयांपर्यंत रक्कम या १३२ माजी सैनिकांनी सुधीर कडे जमा केली. काही दिवस सुरळीत परतावा दिल्यानंतर पैसे परत करण्यास नकार दिला असं पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीत नमूद करण्यात आलं आहे. या संपूर्ण प्रकरणात सुधीरची पत्नी आणि मुलाचाही सहभाग असल्याचे या माजी सैनिकांनी सांगितले.पैसे परत मागितले असता, माझ्याकडे परवानाधारक बंदूक आहे तसेच माझे बंधू पोलिसात आहेत, तुम्हाला जे करायचं आहे ते करून घ्या. अशी धमकी सुधीर चक्रे देत असल्याचेही पोलिसांना दिलेल्या तक्रारीत सांगण्यात आले आहे.

# अमरावती आहे का? डेझी शाहच्या शेतातील फोटोंवर नेटकऱ्यांच्या कमेंट्स, शिव ठाकरे म्हणतो...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३ अमरावती**

बिग बॉस अमरावतीचा वाघ शिव ठाकरे आणि बॉलिवूड अभिनेत्री, डान्सर डेझी शाह (ऊळीू डहरह) एकमेकांना डेट करत असल्याच्या चर्चा अनेकदा होतात. अद्याप दोघांनीही या बातमीला दुजोरा दिलेला नाही. मात्र चाहत्यांचं दोघांकडेही लक्ष असतं आणि ते दोघांना अनेकदा कात्रीक पकडतात. नुकतंच डेझी शाहने शेतात फोटोशूट केलं. यावर चाहत्यांनी अमरावतीला आल्या का मॅडम अशा कमेंट्स केल्या आहेत. तसंच शिवनेही तिच्या फोटोंवर कमेंट केली आहे.

डेझी शाहने कालच तिचे काही क्युच फोटो शेअर केलेत. पांढऱ्या-गुलाबी रंगाच्या चुडीदार ड्रेसमध्ये तिने शेतात हे फोटोशूट केलं आहे. या लूकमध्ये ती अगदी गोड दिसत आहे. तसंच शेतात तिने छान पोज दिल्या आहेत. डेझीने याचं लोकेशन मात्र दिलेलं नाही. यावर चाहत्यांनी तिची चेष्टा केली आहे. ’हे तर शिवच्या घराकडे जाणाऱ्या रस्त्यातलं शेत आहे’, ’अमरावतीला आल्या वाटतं मॅडम’, ’हे अमरावतीच आहे शिवने तिला नागरपूरवरुन पिक केले’, ’शिव भाऊच्या शेतात वहिनी’ अशा कमेंट्स नेटकऱ्यांनी केल्या आहेत.



At this very moment असं कॅप्शन तिने फोटोंना दिलं आहे.

शिवने यावर कमेंट करत लिहिले, ’अच्छा ठीक आहे, काळजी घे जय हिंद, जय महाराष्ट्र, आनंदी राहा बाकी मेसेजवर बोलतो.’ अशी मजेशीर कमेंट त्याने केली आहे.सध्या गणपती उत्सवामुळे शिव ठाकरे अमरावती मुक्कामी आहे हे विशेष .

शिव ठाकरे ’खतरो के खिलाडी सिझन १३’ मध्ये सहभागी झाला होता. यामध्ये अनेक टीव्ही कलाकारही होते. याच सेटवर त्याची आणि डेझीची ओळख झाली. त्यांना अनेकदा सोबत बघितलं गेलं. पण दोघांनी नेहमीच या फक्त अफवा असल्याचं स्पष्ट केलं आहे.

# सौर कृषिपंपांतून शेतकऱ्यांना वीज विक्रीचे उत्पन्न मिळवून देणार : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१३मुंबई**

कृषिपंपाच्या वीज कनेक्शनसाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे वाट पाहण्यापासून मागणीनुसार तत्काळ कृषिपंप अशी राज्याची वाटचाल ‘मागेल त्याला सौर कृषिपंप योजने’मुळे झाली आहे. आगामी काळात सौर कृषिपंपाच्या यंत्रणेतून निर्माण झालेली अतिरिक्त वीज विकून शेतकऱ्याला उत्पन्न मिळण्यासाठी योजना लागू करण्यात येईल, असे प्रतिपादन मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले.

मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेत लाभार्थी शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी महावितरणने तयार केलेल्या वेबसाईटचे उद्घाटन मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत झाले, त्यावेळी ते बोलत होते. योजनेची माहिती देणाऱ्या पुस्तिकेचे व पोस्टरचे प्रकाशनही त्यांनी केले.यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र, महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. पी. अनबलगन, महापारेषणचे अध्यक्ष तथा



व्यवस्थापकीय संचालक संजीवकुमार, मा.उपमुख्यमंत्र्याचे सचिव श्रीकर परदेशी आणि एमएसईबी होल्डिंग कंपनीचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक उपस्थित होते. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, सौर कृषिपंपाच्या पॅनेल्समधून निर्माण होणारी अतिरिक्त वीज ग्रीडमध्ये पाठवून वीज कंपन्यांना विकता येईल व त्यातून शेतकऱ्याला अतिरिक्त उत्पन्न मिळविता येईल, अशी योजना लागू करण्यात येईल. त्यामुळे शेतकरी हा वीजबिल भरणाऱ्याऐवजी वीज विकून उत्पन्न मिळविणारा होईल.ते म्हणाले की, राज्यात २०१४ पूर्वी शेतकऱ्यांना पेड पेंडिंगची समस्या तीव्रतेने जाणवत होती. त्यानंतर आपल्या सरकारमध्ये शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यावर भर देण्यात आला. आता मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेमुळे शेतकऱ्यांना ९० टक्के सबसिडीसह तत्काळ पंप मिळत आहेत. सौर कृषी पंपामुळे शेतकऱ्यांना दिवसा भरवशाचा वीज पुरवठा होत आहे. सौर पॅनेल्समधून २५ वर्षे वीज निर्मिती होत असल्याने तेवढा काळ वीजबिल येणार नाही. साडेसात एचपी पंपाचा विचार केला तर २५ वर्षांच्या कालावधीत त्या शेतकऱ्याचे वीजबिलाचे दहा लाख रुपये वाचणार आहेत. ही योजना मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कुसुम बी योजनेच्या आधारे लागू केली असून आपण पंतप्रधानांचे आभार मानतो.

त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत राज्यात १२ हजार मेगावॅट वीजनिर्मितीचे करार झाले आहेत. आगामी दोन वर्षात त्यातून पूर्ण क्षमतेने वीजनिर्मिती सुरू होईल. त्यामुळे शेतकऱ्यांना सिंचनासाठी शंभर टक्के सौर ऊर्जा मिळेल. शेतकऱ्यांना पर्यावरणपूरक हरित ऊर्जा मिळण्यासोबत अनुदान आणि क्रॉस सबसिडीचे पैसे वाचतील.गेल्या अडीच वर्षातील कार्यकाळ हा राज्यातील ऊर्जा क्षेत्रासाठी टर्निंग पॉईंट ठरला आहे. या काळात तीनही वीज कंपन्यांनी मोलाची कामगिरी केली आहे, असे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी काही लाभार्थी शेतकऱ्यांशी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे संवाद साधला. लाभार्थी शेतकरी या योजनेबद्दल समाधानी असल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला.